मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

follow us : /rajdandlive

✲ RNI Regd. No. 72105/99 ✲ वर्ष २५ ✲ अंक २३७ ✲ सातारा ✲ सोमवार, दि. ६ मे २०२४ ✲ पाने ८ (सुप्रभात) ✲ किंमत ५/– रूपये



श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी मावळमध्ये भाजपचा 'डोअर टू डोअर' प्रचार वृत्त पान ३ वर...

# आपण सगळे एक आहोत, तोपर्यंत बारामतीकरांना कोणी धक्का लावणार नाही

■ शरद पवार यांचे प्रतिपादन



**बारामती :** सत्ता कोणाची असो, जोपर्यंत आपण सगळे एक आहोत, तोपर्यंत बारामतीकरांना कोणी धक्का लावू शकणार नाही, असे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी करून देशाच्या भवितव्यासाठी सुप्रिया सुळे यांना साथ द्या, असे आवाहन करत देशात भ्रष्टाचार, महागाई व बेरोजगारी हे प्रश्न मोठ्या प्रमाणावर निर्माण झाले असल्याची टीका त्यांनी यावेळी केली.

बारामती लोकसभा मतदारसंघाच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांच्या प्रचाराच्या सांगता सभेत पवार बोलत होते. यावेळी माझी दुग्धविकास मंत्री सुनील केदार, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, आमदार रोहित पवार, शिरूर चे आमदार अशोक पवार, भूषणराजे होळकर, श्रीनिवास पवार, शर्मिला पवार, युगेंद्र पवार,सदानंद सुळे, रेवती सुळे, एस एन जगताप, संदीप गुजर, सत्यव्रत काळे आदींसह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शरद पवार म्हणाले, देशामध्ये अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. बेरोजगारी महागाई व भ्रष्टाचार हे प्रश्न देशांमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये आहेत. त्यामुळे ही निवडणूक देशाच्या भवितव्याची आहे. देशात कोणाचीही सत्ता असो, जोपर्यंत आपण सगळे एक आहेत, तोपर्यंत बारामतीकरांना कोणीही धक्का लावू शकत नाही. या निवडणुकीमध्ये पुन्हा एकदा सुप्रिया सुळे यांना जनतेने साथ द्यावी, असे आवाहन करत घसा खराब असल्याने त्यांनी आपले भाषण आटोपते घेतले.

दरम्यान, यावेळी फुलांचा वर्षाव करून शरद पवार यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी माजी मंत्री सुनील केदार यांनी आपल्या भाषणात नरेंद्र मोदी सरकारवर टीका केली. बारामतीकरांनी सुप्रिया सुळे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन यावेळी त्यांनी केले.

खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या, यावेळी केवळ आपलं चिन्ह बदलेललं आहे. पांडूरंगाची इच्छा म्हणून मला तुतारी वाजविणारा माणूस हे चिन्ह मिळालं. तुतारी ही नेहमी शुभकार्यात वाजते. छत्रपती शिवरायांनी युद्धाच्या प्रसंगी तुतारी वाजविली. हे युद्ध भ्रष्टाचार, महागाई यांच्या विरोधात आहे. ते लोक यापुर्वी आपल्या पक्षाला नॅचरली करप्ट पार्टी असे म्हणायचे आता पुत्रीप्रेमामुळे आंधळे झालेल्यांची पार्टी म्हणतात. पण भ्रष्टाचाराच्या आरोपापेक्षा मुलीवर प्रेम करण्याचा आरोप असं बरं असे नमूद केले. मी पक्षाकडे केवळ लोकसभेचं तिकीट मागितलं, ही माझी चूक झाली का असे स्पष्ट करताना ही वैचारीक लढाई आहे. आमच्या घरातली उणीदुणी काढून गॅस कमी होणार नाही. पेट्रोलचे दर कमी होणार नाहीत. मला आरेला कारे करता येते ;पण मी करणार नाही. (पान ५ वर)

## आमदार रोहित पवार यांना अश्रू अनावर

**बारामती : मालकास आघाडीच्या उमेदवार खा. सुप्रिया सुळे यांच्या प्रचाराच्या सांगता सभेत आमदार रोहित पवार यांना अश्रू अनावर झाले. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केलेल्या भावनिक वक्तव्याचा उल्लेख करत साहेब परत तुम्ही असे विधान करू नका, आम्ही सर्व कुटुंबीयय व जनता तुमच्या बरोबर आहोत, असे सांगत रोहित पवार यांना अश्रू अनावर झाल्याने सभेमध्ये निरव शांतता पसरली. बारामती शहरातील 'लेंडी पट्टा' या ठिकाणी मैदानावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांच्या प्रचाराची सांगता सभा झाली. या सभेवेळी ज्येष्ठ नेते शरद पवार व सुप्रिया सुळे यांचे आगमन होताच फुलाचा वर्षाव करत कार्यकर्त्यांनी त्यांचे स्वागत केले.** (पान ५ वर)

# तिसऱ्या टप्प्यातील प्रचाराच्या तोफा थंडावल्या

## दि. ७ मे रोजी राज्यातील ११ मतदारसंघात मतदान









**मुंबई :** तिसऱ्या टप्प्यात राज्यातील ११ लोकसभा मतदारसंघांत ७ मे रोजी मतदान होणार आहे. या मतदारसंघांतील प्रचाराच्या तोफा रविवारी सायंकाळी सहा वाजता थंडावल्या आहेत. अनेक दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

महाराष्ट्रात मंगळवारी तिसऱ्या टप्प्यातील मतदान होणार आहे. यामध्ये बारामती, हातकणंगले, कोल्हापूर, लातूर, माढा, धाराशिव (उस्मानाबाद), रायगड, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, सांगली, सातारा व सोलापूर या लोकसभा मतदारसंघाचा समावेश आहे.

रविवारी सायंकाळी सहा वाजेपर्यंत प्रत्येक मतदारसंघात जोरदार प्रचार सभा पडल्या. बारामती लोकसभा मतदारसंघात आज तर सांगता सभेचा थरार पाहायला मिळाला. एकीकडे अजित पवार यांच्या नेतृत्वातील सभा व दुसरीकडे शरद पवार यांच्या नेतृत्वातील सुप्रिया सुळे यांच्या प्रचारार्थातील सभा चांगलीच गाजली. एकमेकांवर जोरदार निशाणा साधल्याने रविवार जणू पवार प्रचार संडेच वाटू लागला होता.

दुसरीकडे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माढा लोकसभा मतदारसंघात जोरदार सभा पार पडली. यावेळी त्यांनी शरद पवार यांच्यावर देखील निशाणा साधला. बारामतीसह राज्यातील सर्वच ठिकाणी पवार विरुद्ध पवार असा लढा नाही तर मोदी विरुद्ध राहुल गांधी असा लढा आहे. त्यामुळे मतदारांनी उज्वल भवितव्यासाठी महायुतीला पसंदी द्यावी, अशी साद त्यांनी घातली.

# वणव्याच्या आगीत घर जळून खाक

## पाचगणी येथील घटना; घरमालक गंभीर जखमी



**वाई :** पाचगणी (ता. महाबळेश्वर) येथे वणव्यात ऐका पत्र्याच्या छपराला आग लागल्याने हे घर जळून खाक झाले तर मालक गंभीर जखमी झाला आहे. त्याला सातारा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे.

आज दुपारी पांचगणी येथील एम. आर. ए. सेंटर परिसरात डोंगराच्या बाजूला अज्ञाताने लावलेला वणवा एम. आर. ए. सेंटरच्या कार्यालयाकडे फोफावला आणि शेजारी असणाऱ्या खाजगी जागेतील पत्र्याच्या घराभोवती ही आग पसरली. घराने पेट घेतला. अख्खे घर आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. घराला कुलूप होते. एम. आर. ए. चे कर्मचारी आगिकडे धावले. परंतु आतून अचानक आवाज आला. आत घराचे मालक अनिल माने (मूळ गाव दानवली (पान ५ वर)

## अवैध गुटखा वाहतूक करणाऱ्यांवर मेढा पोलिसांची कारवाई

**मेढा :** जावळी तालुक्यात केळघर नजीक गुटख्याची अवैद्य चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतुक करणारे इसमांवर मेढा पोलिसांनी मोठी कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत बेकायदेशीर गुटक्याचा मुद्देमाल व वाहन असा एकूण ५.७८ ७१२/- रूपयांचा मुद्देमाल जप्त संबधीत इसमाकडून जप्त करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांची माहिती अशी, केळघर (ता. जावली), गावचे हद्दीमध्ये नेमण्यात आलेले स्थायी निगराणी पथक हे त्यांचे नेमलेले केळघर येथील पॉईटवर वाहनांची तपासणी करीत असताना मेढा बाजूकडून केळघर बाजूकडे (पान ५ वर)

# पिण्यास पाणी मिळत नाही आणि 'स्मार्ट सिटी' करायला निघालेत : ॲड. बाळासाहेब आंबेडकर

■ हडपसरमध्ये वंचित बहुजन आघाडीचे ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांची जाहीर सभा



**हडपसर : प्रतिनिधी**

नागरीकांना पिण्यास साधे पाणी मिळत नाही आणि भाजपवाले स्मार्ट सिटी बनवायला निघालेत,पाण्याचा प्रश्न मोठा असल्याने ना शहराला ना शेतीला पाणी पुरत नाही लोकसंख्येनुसार पाण्याचे नियोजन झाले पाहिजे. नवीन शहरे विकसित केली तर पाणी नियोजन करता येईल. सरकार नागरीकांना चांगले घरांचे स्वप्न दाखवते प्रत्यक्षात मात्र आपल्याला फसवणारे बिल्डर आहेत. भारतीय जनता पक्षाने संविधान संपविण्याचे जाहीर केले आहे. शरद पवार बीजेपी बरोबर जाणार नाही, याची गँरंटी आहे का? २०१४ ला परस्पर साथ दिली. दोस्ती एका बरोबर आणि लग्न दुसऱ्याबरोबर हे त्यांचे धोरण आहे. जोपर्यंत समाज अस्थिर आहे तोपर्यंत कोणी हलवू शकत नाही, ही भूमिका मोदी सरकारची आहे.

आम्ही पवार व ठाकरे यांना पुढच्या पाच वर्षांसाठी भाजपबरोबर न जाण्याचे लिहून मागितले होते. मात्र, राजकारण असे चालत नाही, असे म्हणत त्यांनी आम्हाला बरोबर घेणे टाळले. ओबीसी मराठ्यांच्या बरोबर नाही आणि मराठा ओबीसींबरोबर नाही. बीजेपीला हरविण्यासाठी मुसलमान बनण्याची गरज आहे. शरद पवारांमध्ये हिंमत नाही भिती आहे. त्यामुळे ते मोदीं विरोधी बोलत नाहीत. आदीवासी व ओबीसींबरोबर मुसलमान का जाऊ शकत नाही. वंचित मुसलमानांना बरोबर घेऊ पाहत आहे. म्हणून डॉ. शेख यांना आमच्या पक्षाने उमेदवारी दिली. आता बीजेपीला हरविण्याची संधी आली आहे. चार लाखाच्या पुढे मतदान घेणार व जिंकणार,

मोदी सरकार आपल्याच लोकांच्या विरोधात आहे. देशातील जनता असा सरकारला वैतागलेली (पान ५ वर)

# एवढे वर्ष त्यांना संधी दिली, आता आम्हाला द्या!

## भोर वेल्हे (राजगड) चा विकास नाही झाली तर काळे झेंडे दाखवा - अजित पवार



**भोर/प्रतिनिधी**

नरेंद्र मोदी देशातले विकास पुरुष असून ते देशाला पुढे घेऊन चालले आहेत त्याप्रमाणे महाराष्ट्रा ला मला पुढे घेऊन जायचे आहे. केंद्रात मोठा निधी असून तो आणण्यासाठी त्यांच्या विचाराचा खासदार असावा लागतो त्यासाठी सुनेत्रा पवार यांना निवडून द्या म्हणजे भरपूर निधी आणता येईल. एवढे वर्ष त्यांना संधी दिली आता आम्हाला द्या भोर, राजगड ( वेल्हे ) चा विकास नाही झाला तर पुढे मला काळे झेंडे दाखवा.असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

भोर येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या प्रांगणात महायुतीच्या बारामती लोकसभा उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या प्रचारार्थ रविवार (दि.५) आयोजित करण्यात आलेल्या सभेत ते बोलत होते.

यावेळी मंत्री अनिल पाटील, आमदार सुनिल शेळके, आमदार शरद ढमाले, प्रदीप गारटकर, रणजित शिवतरे, तालुका अध्यक्ष संतोष घोरपडे, पुणे जिल्हा बँकेचे संचालक भालचंद्र जगताप, यशवंत डाळ, विक्रम खुटवड, चंद्रकांत बाठे, भाजपचे तालुका अध्यक्ष जीवन कोंडे, अमर बुदगुडे, बाळासाहेब गरुड, दिपाली शेटे, रमेश कोंडे, प्रविण जगदाळे, समीर घोडेकर, अविनाश गायकवाड, सुनिल गायकवाड यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना अजित पवार म्हणाले की निवडणूक प्रचार सभा म्हंटले की आरोप प्रत्यारोप आलेच.मीह्याआधी महाविकास आघाडीत पालकमंत्री असताना माझ्याकडे राजगड साखर कारखान्यासाठी मदतीची मागणी केली तेंव्हा मदत केली. विकासासाठी आमदारांनी, खासदारांनी इथले (पान ५ वर)

## करण सेनेच्या प्रसंगावधाने बाका प्रसंग टळला

**म्हसवड :** युवकांचे मोठे संगठन असलेल्या म्हसवड येथील करण पोरे यांनी या संघठनाच्या जोरावर अनेक सामाजिक कार्ये नेहमीच मोठ्या दिमाखात पार पाडली आहेत, त्यांच्या या संगठनात्मक धोरणामुळे ते माण तालुक्यातील एक युवा नेतृत्व म्हणुन समोर आले आहे, त्यांच्या पाठीशी असलेल्या युवाशक्तीला म्हसवड शहरात करण सेना असे आता संबोधले जावु लागले असुन याच करण सेनेने दाखवलेल्या प्रसंगावधामुळे एक बाका प्रसंग टळला असल्याने नागरीकांतुन करण पोरे व त्यांच्या सवंगड्यांचे आभार मानले जात आहे.

याबाबत माहिती अशी की, येथील म्हसवड -पुळकोटी रस्त्यावर अचानक वीज तार तुटल्याने शॉर्टसर्कीट झाले यामध्ये आग लागली वाळलेले झाडझुडपे व उन्हाळ्याचे दिवस असलेने आगीने रौद्र स्वरूप धारण केले. सदरची घटना घडली त्यावेळी करण पोरे हे आपल्या सवंगड्यांसोबत लोकसभेचा प्रचार करण्यात व्यस्त होते, सदरची घटना त्यांना प्रचारादरम्यान समजली असता (पान ५ वर)

# निवकणे, बिबी, चिटेघर धरणांची कामे बंद पाडणारांकडून जनतेची फसवणूक

## माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांचा आरोप



**पाटण/प्रतिनिधी**

पाटण तालुक्यातील निवकणे, बिबी, चिटेघर धरणांची कामे बंद पाडणारेच आता घोषणा करून निधी मंजूरीचे आकडे जाहिर करत सुटले आहेत. हे निवडणूकीपुरतेचे आहे हे आता जनतेच्या चांगलेच लक्षात आले आहे. धरणाच्या कामासाठी आलेली कोट्यवधी रूपयांची मशिनरी जागेवरच सडून गेली. डोंगरावरील जनता डोंगरावरतीच राहीली आणि पुनर्वसनाचे प्रश्न तसेच लोंबकळत पडले. धरणांची कामे बंद पाडणारेच आता धरणाचे काम सुरू करतो म्हणून जनतेची फसवणूक करत असल्याचा आरोप माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांनी पत्रकार परिषदेत बोलताना विरोधकांवर केला.

पाटण येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

माजी मंत्री पाटणकर पुढे म्हणाले, तालुक्यात फसव्या घोषणा सूरू आहेत. गेली ८ वर्षे पाटण तालुक्याचा विकास रखडला आहे. नुसत्या घोषणा ऐकून पाटण तालुक्यातील जनतेची पोटे फुगली, मात्र गेल्या ८ वर्षातील जुने प्रश्न सुटले नाहीत याउलट नवीन प्रश्न निर्माण झाले. कोयना विभागाची धुळधाण केली, तरूणांना बेरोजगार केले, बोटींग बंद केले, पर्यटनाच्या नावाखाली भलतेच पर्यटन सुरू झाले. निर्सगाचे वरदान लाभले असून ते येथील लोकांचे भांडवल आहे. म्हणुन पर्यटन वाढले पाहिजे होते मात्र निधी निरनिराळया योजना दाखवून इतरत्र सिमेंट कॉक्रीटच्या इमारती उभ्या करणे म्हणजे पर्यटन विकास नव्हे. मोरणा-गुरेघर कॅनॉलसाठी मागणी का नाही? माझा बालेकिल्ला माझा बालेकिल्ला म्हणून मताच्या कारणापुरता मोरणा भागातील लोकांचा वापर करायचा हे पाटण तालुक्यातील जनने ओळखले आहे. मोरणा-गुरेघर धरण कामाचा भूमीपूजन कार्यक्रम तत्कालीन मुख्यमंत्री शरदचंद्रजी पवार व तत्कालीन पाटबंधारे मंत्री पद्मसिंह पाटील यांचे हस्ते झाला. ते धरण झाले म्हणून मोरणा नदीच्या काठावरील गावातील लोकांना पिण्यासाठी व बागायत शेती करण्यास पाणी मिळत आहे. नाहीतर त्यांचे जीवन जगणे मुश्कील झाले असते. त्यावेळेस धरणाला कोण विरोध करत होते हे जनतेला माहित आहे.

लोकनेत्यांची पुण्याई सांगून जनतेची फसवणूक करू नये. तालुक्यातील जनता आता हुशार झाली आहे. ख-या खोटयाची जाणीव त्यांना आता होवू लागली आहे. आमचे सर्व कार्यकर्ते एकजुटीने पूर्ण ताकद लावून काम करत आहेत. आमच्यात कोणतेही मतभेद नाहीत हेच निवडणूकीनंतर दिसून येईल. असे आवाहनही शेवटी माजी मंत्री पाटणकर यांनी केले आहे.

# भाजप संविधान बदलणार, हा प्रचार खोटा - नितीन गडकरी

## काँग्रेसनेच ८० वेळा घटनेची मोडतोड केली



**दहिवडी :** भाजप सत्तेवर आल्यास संविधान बदलेल हा खोटा अपप्रचार काँग्रेसकडून होत आहे या उलट आजपर्यत ८० वेळा काँग्रेसनेच संविधान बदलण्याचा प्रयत्न केला असा पलटवार दहिवडी येथील सभेत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केला. ते माढा लोकसभेचे महायुतीचे उमेदवार रणजितसिंह निबाळकर यांच्या प्रचारार्थ दहिवडी ता. माण येथिल सभेत येथे बोलत होते.

यावेळी माजी खासदार विकास महात्मे, आ.जयकुमार गोरे, आ.महादेवराव जानकर, सदाभाऊ खोत, सौ. सोनिया गोरे, डॉ. दिलीपराव येळगावकर, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत जाधव, अँड. भास्करराव गुंडगे, सिध्दनाथ पतसंस्थेचे चेअरमन अरूण गोरे, राष्ट्रवादी अजितदादा पवार गटाचे युवराज सूर्यवंशी, प्रा. बंडा गोडसे, डॉ. संदीप पोळ, तालुकाध्यक्ष शिवाजीराव शिंदे, गणेश सत्रे आदी प्रमुख मान्यवर,पदाधिकारी उपस्थित होते.

गडकरी पुढे म्हणाले या भागातल्या पाणी सिंचन योजने करता मला निधी देता आला आपल्या सगळ्यांची समस्या ही पाणी आहे ती सोडविण्याचे काम तत्कालीन मी मंत्री असताना ते मी केले आहे.मी कधीही जातीपातीच राजकारण करत नाही.विकासाच्या राजकाराणाची गरज आहे.

७५ वर्षात पाणी का मिळाल नाही रस्ते चांगले का नाहीत,शाळा चांगल्या का नाहीत रोजगारासाठी बाहेर का जावे लागते की जावे लागले शेतमालाला दर का नाही?

तुमच्या या माढा मतदारसंघात २० हजार कोटीची कामे मी केलीत आता नुकतेच बाराशे कोटी रुपये फलटण दहिवडी वीटा रस्त्यासाठी दिलेत लोकसभा निवडणुक संपली की एका महिन्याच्या आत काम सुरू होतील.

१० वर्षात जेवढी काम केली तेवढी ६० वर्षात काम काँग्रेसने केली नाहीत. भविष्यातील जीवनमान कोण बदलवू शकतो, पाणी वीज रस्ते रोजगार कोण देऊ शकतो त्यांना मतदान करा इथ आपला देश आत्मनिर्भरर बनवायचाय तिसरी आर्थिक महासत्ता बनवायचीय. पुणे बेंगलोर एक्सप्रेस करताना दुष्काळी भागातून न्या अस म्हटले होते म्हणजे रोजगार उपलब्ध होईल.

आ. जयकुमार गोरे म्हणाले .मोदी जेव्हा शपथ घेतील तेव्हा हा माण खटावचा वाघ जानकर साहेब त्यांच्या सोबत असतीलच. देशात कायम चर्चेत असणारा माढा लोकसभा मतदारसंघ (पान ५ वर)

# !! गुबूगुबू वाजतयां... सातारा लोकसभा !!

आपणा सर्वांना विक्रम वेताळाची गोष्ट माहित आहे, राजकुमाराच्या मानगुटावर वेताळ बसलेला असतो, हल्ली देशात राज्यात असाच ईडी नावाचा वेताळ बहुतांश राजकारण्यांच्या मानगुटावर भाजप सरकारने ठेवलेला आहे तो वेताळ धमकावतो त्या दिशेने बरेचसे लोकप्रतिनिधी जाताना आपण बघितलेले आहेत. अशाच ईडी नावाच्या वेताळाला धोबीपछाड देणारा ८४ वर्षाचा तरुण असा ज्यांचा आदराने उल्लेख केला जातो ते ओरिजनल राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा श्री शरद पवार, आभ्यासू काँग्रेस नेते श्री पृथ्वीराज चव्हाण, जिगरबाज शिवसेना नेते श्री उद्धव ठाकरे ह्या त्रिकुटाने महाराष्ट्रात भाजपाप्रणित महायुतीची वाट बिकट करून ठेवली आहे.

सध्या आपण देशातील महत्त्वपूर्ण अशा लोकसभा निवडणुकीला सामोरे जात आहोत, देशाचं भवितव्य ठरवणारी देशाला दिशा देणारी ही निवडणूक. वास्तविक ही निवडणूक विकासाचे मुद्दे व सामाजिक प्रश्नांना घेऊन लढली जाणं गरजेचे आहे परंतु गेल्या दहा वर्षात भाजपप्रणित युतीने ज्या काही निवडणुका लढल्या त्या नेहमी महत्त्वाच्या प्रश्नांऐवजी इतर गोष्टी भोवती फिरवत ठेवल्या कधी पंतप्रधानपदाच्या चेहऱ्याभोवती, कधी देव धरम, जातीवादी राजकारण, कधी ३७० कलम तर कधी पुलवामा हल्ला प्रत्येक वेळी निवडणूक आली की महत्त्वाच्या प्रश्नांना बगल देण्याचा प्रयत्न




भाजपाकडून केला जातो. अलीकडेच देशाच्या पंतप्रधानांनी भाकीत केलं की काँग्रेस पक्ष सत्तेत आला तर स्त्रियांच्या मंगळसूत्राला धोका आहे. वस्तुस्थिती काय आहे स्व. मोतीलाल नेहरू, जवाहरलाल नेहरू यांनी स्वत:ची संपत्ती देशाला मदत म्हणून दिली, आतापर्यंत काँग्रेसने देशाला आठ पंतप्रधान दिले त्यांच्याच दूरदृष्टीतून अखंड देश उभा राहिला, म्हणजे या तर चोराच्या उलट्या बोंबा झाल्या. ६५ वर्षात काँग्रेसने उभं केलं ते ह्या मंडळींनी गेल्या १० वर्षात मोडून खाल्लं, ५० लाख कोटींच कर्ज २०० लाख कोटीवर नेहून ठेवलं.८० कोटी जनतेला गरिबीचा शिधा दिला अस जर ही मंडळी ऊर बडवून सांगत असतील तर मग ह्यांनी कसला विकास केला हा प्रश्न सर्वसामान्यांना पडतो. २०१४ साली सोशल मीडियाचा प्रभावीपणे वापर करून भाजपा सत्तेत आली, सत्तेच्या जोरावर ह्या मंडळींनी इतका उच्छाद मांडला की जनता पुरती होरपळून निघाली त्यामुळे ही मोदी विरुद्ध सामान्य जनता अशीच थेट लढत आहे. आता महाशक्ती, चाणक्य, हिंदुत्व काही चालणार नाही, जनतेनीच ही निवडणूक डोक्यावर घेतलीय.

काहीही करून भाजपचं वर्चस्व राहिले पाहिजे, देशातले विरोधक नामशेष झाले पाहिजेत खरं म्हणजे सक्षम विरोधक हे सुदृढ लोकशाहीचे लक्षण आहे परंतु या मंडळींना हे मान्य नाही. आम्ही सांगू तो कायदा, मी राबवू ते धोरण हीच ह्यांची कामाची पद्धत, गेल्या अडीच तीन वर्षापासून तर यांनी महाराष्ट्रात अभूतपूर्व गोंधळ घातलाय पक्ष फोडने, आमदार खासदार फोडने हे अगदी नित्याचं झालय, हिंदूंची अस्मिता जपणारी शिवसेना फोडली, पुरोगामी विचारांचा पुरस्कार करणारी राष्ट्रवादी फोडली, काँग्रेसचीही अवस्था तीच. शिवसेना व राष्ट्रवादीमध्ये घडवून आणलेली फुट हा आता हा त्यांचा पक्षाअंतर्गत विषय राहिलेला नाही तर तो महाराष्ट्रातील महत्त्वाचा सामाजिक प्रश्न बनला आहे. श्री जयंत पाटलांचं एक भाषण अगदी प्रसिद्ध आहे. ते सांगतात ड गेला तरी चालेल, ब गेला तरी आम्हाला काही चिंता नाही कारण त्यांच्याकडे शरद पवार नावाचा विद्यापीठ आहे. खरंय ते, स्व. बाळासाहेब ठाकरे तसेच शरद पवार ही चालतीबोलती विद्यापीठचं आहेत परंतु ह्या विद्यापीठातले सर्वच विद्यार्थी गुणी असतील असं मानण्याचं काही कारण नाही, काही हुशार असणार, काही आळशी लबाड असणार, त्यातल्या काहींना चोरीची सवय लागलेली, चोऱ्या करून करून हे गडी इतकं मुंडारलं की त्यांनी दरोडाच टाकायचं ठरवलं म्हटले विद्यापीठच गायब करू, केलं धाडस, काय घडलं छप्पर काढून नेलं, बोर्ड काढून न्हेला,काही प्रमाणात फर्निचर,सतरंज्या ताडपद्र्या अगदी पायपुसण्या सुद्धा न्हेल्या परंतु इतकं सर्व घडून सुद्धा शिवसेना व राष्ट्रवादीला गेल्या दीड - दोन वर्षात जे लोकांच समर्थन मिळतय, पाठिंबा मिळतोय त्यावरून ह्या विद्यापीठाचे आडं अजून शाबूत आहे, भिंती जशाच्या तशाच आहेत, पाया एकदम मजबूत आहे हेच सिद्ध होतं. ह्या अगोदर देशात अनेक सरकार येऊन गेली भ्रष्टाचार झाला नाही असं नाही पूर्वीही भ्रष्टाचार झाल्याची अनेक उदाहरणे आहेत परंतु बीजेपीचा कारभार एकदम वेगळा आहे. अगदी होलसेल दरोडा हा एकप्रकारचा संघटित भ्रष्टाचारच आहे आणि त्याच्या बळावर त्यांनी संपूर्ण देशच वेठीला धरला आहे. कायदेमंडळात हे स्वत:च आहेत, न्यायपालिका, प्रशासन, प्रसारमाध्यमं अगदी सगळं यांच्या खिशात, लोकशाहीचे चारही स्तंभ यांनी उद्वस्थ केले, मनमानी कारभार चालू आहे. हे सगळं थांबवण्याची ताकद तुमच्या एका मतात आहे त्याचा हुशारीने वापर केला तर बीजेपीचा हा वारू तुम्ही आम्ही रोखू शकतो.

मध्यंतरी एका दक्षिणेतील सिनेमाच्या अनुषंगाने एक प्रश्न सगळ्यांना पडला होता. 'कटप्पा ने बाहुबली को क्यू मारा' तसाच एक प्रश्न सध्या देशाच्या राजकारणात बऱ्याच जणांना पडलाय तो म्हणजे पवार साहेब रिटायर्ड कधी होणार,राजकारणातून निवृत्त कधी होणार, जगात इतके थोर समाजसुधारक लोकहितवादी होऊन गेले त्यांनी अगदी शेवटच्या श्वासापर्यंत समाजाची सेवा केली हा इतिहास आहे, तिथ लोकांना मदत करायला, त्यांची सेवा करायला कुठे वयाचं बंधन आलं नाही. बीजेपी वाल्यांनी मात्र राजकीय निवृत्तीची वयोमर्यादा घातली आहे कारण भाजपा आणि त्यांच्या मित्रांला त्यांच्या सोईचं राजकारण करायचं आहे ,राजकारण हा त्यांचा व्यवसाय आहे, धंदा आहे. हे लोकशाहीवर झालेलं आक्रमण आहे आणि हे जर परतवून लावायचं असेल तर या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या पाठीशी ठामपणन उभं राहणं ही तुमची आमची जबाबदारी आहे.महाविकासाघाडीचा उमेदवार निवडून देणं गरजेचं आहे.

श्री शशिकांत शिंदे म्हणजे पवार विद्यापीठाचा स्कॉलर विद्यार्थी, त्यांच्या कार्यकर्तृत्वाने एक 'कामाचा माणूस' असा ब्रँड त्यांनी निर्माण केलाय. महाविकासआघाडिकडे स्कॉलर आहे विरोधात कॉलर आहे निर्णय तुम्हाला घ्यायचाय.मतदान हा लोकशाहीने आपल्याला बहाल केलेला पवित्र दागिना आहे आणि हे पवित्र मत आपण महाविकास आघाडीच्या पारड्यात टाका, तुतारी फुंकणारा माणूस या चिन्हासमोरच बटन दाबून श्री शशिकांत शिंदे यांना प्रचंड बहुमताने विजयी करा.

सबब, महाराष्ट्र लोकसभा हा दिल्ली दरवाजा आहे, बाकी आपण सुज्ञ आहात.

- कल्याण पिसाळ देशमुख

## निवडणुकीसाठी पोलीस कर्मचारी गुरक्षक दल जवानांनी केले मतदान



**शिरोळ** : हातकणंगले लोकसभा मतदार संघांतर्गत शिरोळ विधानसभा मतदारसंघातील मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त असलेले पोलीस कर्मचारी गृहरक्षक दलाच्या जवानांनी रविवारी केले मतदान

लोकसभा निवडणूक प्रक्रिया मंगळवार दिनांक ७ मे २०२४ रोजी कोल्हापूर जिल्ह्यामध्ये होत असून हातकणंगले लोकसभा मतदार संघामधील शिरोळ विधानसभा मतदारसंघातील विविध गावांमध्ये मतदान प्रक्रिया होणार असून या मतदान प्रक्रियेसाठी सुरक्षित मतदान प्रक्रिया पार पडण्यासाठी पोलीस व गृहरक्षक दलाच्या जवानांची प्रत्येक मतदान केंद्रावर नियुक्ती केली आहे या मतदान प्रक्रियेसाठी मतदान अधिकारी ,कर्मचारी, पोलीस , गृहरक्षक दलाचे जवान मतदान साहित्य घेऊन उद्या सोमवारी सकाळी शिरोळ तहसीलदार कार्यालय येथून नियुक्त मतदान केंद्रावर जाणार आहेत सोमवार व मंगळवार या दोन्ही दिवस मतदान सुरळीतपणे पार पडण्यासाठी मतदान केंद्रावर कार्यरत असतात यासाठी त्यांची मतदान प्रक्रिया आज रविवारी पार पडली

पोलीस आणि गृहरक्षक दलाच्या जवानांची शिरोळ प्रशासकीय इमारत येथे मतदान प्रक्रिया पार पडली

पोलीस आणि गृहरक्षक दलाच्या जवानांनी आपल्या पवित्र मतदानाचा हक्क बजावत असताना पसंतीच्या उमेदवाराला उत्साहाने मतदान केले ही मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली

## कर्तृत्वशून्य लोकांकडूनच जाती-धर्माच्या नावे राजकारण केले जाते

### नितीन गडकरींचा टोला



**मिरज:** स्वप्न दाखवणारा नेता जनतेला आवडत असतो; मात्र स्वप्न पूर्ण न करणाऱ्या नेत्याला जनता उखडूनसुद्धा टाकते. जे नेते आपल्या कर्तृत्वावर निवडून येऊ शकत नाहीत तेच जात आणि धर्माच्या नावावर राजकारण करतात, असे मत केंद्रीय रस्ते वाहतूक व दळणवळणमंत्रीनितीन गडकरीयांनी व्यक्त केले.

भाजप उमेदवार खासदार संजय पाटील यांच्या प्रचारार्थ मिरजेत संवाद मेळावा पार पडला. यावेळी गडकरी म्हणाले की, इंधन व विजेऐवजी हायड्रोजनचा पर्याय उपलब्ध करून दिला जाईल. पेट्रोल पंपाप्रमाणे हायड्रोजन स्टेशन रस्त्यावर उपलब्ध असतील. विकसित भारतात जल, जमीन व जंगल याच्या आधारावर अर्थव्यवस्थेचा विचार करून शेतकऱ्याला समृद्ध केले जात आहे.काँग्रेसचे आर्थिक धोरण भंगारात गेले. विकासाचे कुठलेही व्हिजन काँग्रेसकडे नव्हते. त्यामुळे जनतेने त्यांना नाकारले. काँग्रेसच्या काळात जलसिंचनाच्या योजना रखडल्या होत्या. रस्त्यांची कामे होत नव्हती. या परिस्थितीत २०१४ला नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकार आल्यानंतर जलसिंचन, रस्ते व पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर दिला. जलसिंचन योजना गतीने राबविल्यामुळेसांगली, सातारा, सोलापूर, कोल्हापूर जिल्ह्यात हरितक्रांती झाली. सगळीकडे पाणी पोहोचले. मी जलसंपदा मंत्री असताना बळीराजा संजीवन योजनेतून नऊ हजार कोटी आणि प्रधानमंत्री कृषी संजीवन योजनेतून ११ हजार कोटी रुपये जलसिंचनाकरिता दिल्याने लाखो एकर जमीन पाण्याखाली आली. जिल्ह्यात जत, आटपाडी, तासगाव, कवठेमहांकाळ, खानापूर या तालुक्यांत जलसिंचन योजनांमुळे आमूलाग्र बदल झाला.

गडकरी म्हणाले, गरिबी दूर करणारा, सामान्य माणसाच्या अपेक्षा पूर्ण करणारा, गरिबांचे कल्याण करणारा भाजप व नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत विश्वगुरू व्हायचा असेल तर भाजपशिवाय पर्याय नाही. विसाव्या शतकात अमेरिका सुपर पॉवर झाला. २१वे शतक भारताचे आहे. शेती उद्योग, निर्यात यावर भर दिल्याने २५ कोटी लोक गरिबी रेषेच्या वर आले.

यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री सुरेश खाडे, पश्चिम महाराष्ट्र संघटनमंत्री दीपक शिंदे, भाजप जिल्हाध्यक्ष निशिकांत पाटील, माजी आमदार नितीन शिंदे, माजी आमदार रमेश शेंडगे, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष प्रा. पद्माकर जगदाळे, माजी महापौर सुरेश पाटील आदी उपस्थित होते.

## पार्किंगमुळे 'रेल्वे'च्या तिजोरीत महिन्याला ३७.६९ लाखांची भर

### रेल्वे स्थानक प्रशासनाची माहिती



**नागपूर** : रेल्वेस्थानक परिसरात प्रशासनानेपार्किंगच्यासमस्येवर तोडगा काढताच प्रवाशांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली आहे. तर दुसरीकडेरेल्वेप्रशासनाच्या तिजोरीतही घसघशीत भर पडली आहे.

गेल्या दोन ते तीन वर्षांत मुख्य रेल्वे स्थानक परिसरातपार्किंगचीसमस्या खूपच जटिल झाली होती. स्थानकावर येणाऱ्या प्रवाशांना एकीकडे वाहन लावायला जागा उपलब्ध नव्हती तर दुसरीकडे बाहेरगावाहून येणाऱ्या प्रवाशांना टॅक्सी किंवा ऑटो वगळता दुसरे वाहन पाहिजे असेल तर बरेच दूर पायी जाऊन साधन मिळवावे लागत होते. रेल्वे स्थानकाजवळून बनविण्यात आलेल्या उड्डाणपुलाने ही समस्या आणखीच जटिल बनविली होती. त्यात गणेश टेकडी पूलही हटविण्यात आल्याने प्रवाशांच्या नाकी नऊ आले होते. पुरेशी जागा नसल्याने रेल्वे स्थानकासमोरच्या मार्गावर वाहतुकीचा वारंवार खोळंबा होत होता. तर, वाहने लावण्यासाठी जागाच नसल्याने रेल्वे प्रशासनाच्या नावाने प्रचंड ओरड होत होती. या पार्श्वभूमीवर येथील शीर्षस्थ अधिकाऱ्यांनी उपलब्ध जागेतच योग्य ते नियोजन करून पार्किंगची व्यवस्था केल्याने एकीकडे प्रवाशांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली आहे. वारंवार होणारी ट्रॅफिक जामची समस्या निकाली निघाली आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, पार्किंगच्या व्यवस्थेतून रेल्वेच्या तिजोरीत घसघशीत भर पडू लागली आहे. रेल्वे स्थानकावर देण्यात आलेल्या पार्किंगच्या कंत्राटातून एकट्या एप्रिल महिन्यात ३७ लाख, ६९ हजार रुपयांची प्रशासनाला कमाई झाली आहे.

### महिनाभरात दुचाकीतून १०.०६ लाख

**घरोघरी, जागोजागी दुचाक्या दिसत असल्याने उपराजधानीला दुचाक्यांचे शहर म्हणूनही ओळखले जाते. पाहिजे त्या ठिकाणी लवकर पोहोचता यावे म्हणून अनेक जण दुचाकीवरच प्रवासाला प्राधान्य देतात. रेल्वे स्थानकावर रोज हजारो दुचाक्या बघायला मिळतात. त्यामुळे दुचाकी पार्किंगच्या कंत्राटातून मिळालेल्या १०.०६ लाखांच्या मोबदल्याचाही समावेश आहे.**

## अंबाबाईच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**कोल्हापूर** : कोल्हापुरात रविवारी करवीर निवासिनी अंबाबाईच्या दर्शनासाठी हजारो भाविकांनी गर्दी केली होती. शाळांना सुट्टी असल्यामुळे अनेकांनी मुलांसह नातेवाईकांसोबत रविवारची सुट्टी जोडून घेत सहल आणि देवदर्शनासाठी कारणी लावली. मंगळवारी मतदान, बुधवारी शिवजयंती आणि शुक्रवारी अक्षय तृतिया असाही मुहूर्त भाविकांनी साधला. यामुळे रविवारी कोल्हापुरात तब्बल ५६ हजार ९५४ भाविकांनी अंबाबाईचे दर्शन घेतले. शहरात मोठी गर्दी झाल्यामुळे अनेक ठिकाणी वाहतुकीची कोंडी झाली होती.



सुटीला जोडून पर्यटनासाठी बाहेर पडलेले पर्यटक आणि भाविकांमुळे रविवारीकोल्हापूरहाऊसफुल झाले होते.

बाहेरगावांहून आलेल्या पर्यटकांमुळे रविवारी कोल्हापूर शहरासह परिसरातील धार्मिक आणि पर्यटनस्थळांवर गर्दी होती. पुणे, मुंबईहून आलेल्या पर्यटकांनी करवीर निवासिनी अंबाबाई देवी, जोतिबा डोंगर, न्यू पॅलेस, किल्ले पन्हाळगड, नरसोबाची वाडी या ठिकाणी गर्दी केली.

यामुळे शहरातील महाद्वार रोड, ताराबाई रोड, जयोतिबा रोड, खासबाग, भाऊसिंगजी रोड, छत्रपती शिवाजी चौक, चप्पल लाइन, पापाची तिकटी, आदी परिसरात पर्यटकांची गर्दी होती.

मोठ्या संख्येने पर्यटक आल्याने शहरातील खासगी यात्री निवास, धर्मशाळा, तसेच घरगुती राहण्याची ठिकाणेही हाऊसफुल होती.

अंबाबाई मंदिरात भाविकांची गर्दीअंबाबाई मंदिरात देवीदर्शनासाठी सकाळी सहा वाजल्यापासून भाविकांची गर्दी असल्याचे चित्र रविवारी दिवसभर दिसत होते. मंदिराबाहेरील चप्पल स्टँडवरील आपले चप्पल शोधून काढण्यासाठी अनेक भाविकांची तारांबळ उडाली होती.

## भाजपाच्या बड्या नेत्याची मल्लिकार्जुन खरगेंबरोबर गुप्त बैठक

### प्रकाश आंबेडकरांच्या गौप्यस्फोटाने राजकारणात खळबळ

**अहमदनगर** : अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाचे उमेदवार खासदार सुजय विखे पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते निलेश लंके यांच्यात लढत होत आहे. तसेच नगर दक्षिण लोकसभेसाठी वंचित बहुजन आघाडीकडून दिलीप खेडकर हे उमेदवार आहेत. आज दिलीप खेडकर यांच्या प्रचारासाठी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांची नगरमध्ये सभा पार पडली. या सभेला संबोधित करत असताना प्रकाश आंबेडकर



यांनी खासदार सुजय विखे आणि राधाकृष्ण विखे पाटील यांच्याबाबत मोठा गौप्यस्फोट केला. तसेच काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांच्यासाठी एक धोक्यांची घंटा असल्याचे सूचक विधानही प्रकाश आंबेडकर यांनी केले.

प्रकाश आंबेडकर नेमके काय म्हणाले?

''अहमदनगरमधील भारतीय जनता पक्षाचे उमेदवार हे २८ मे २०२३ रोजी रात्री ११:३० वाजता तुघलक लेनमध्ये काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची भेट घेऊन आले आहेत. त्यामुळे ही भेट बाळासाहेब थोरात यांच्यासाठी चांगली आहे, असे मी मानत नाही. आता बाळासाहेब थोरात यांच्यासाठी दुसरी धोक्याची घंटा म्हणजे ९ जून २०२३ रोजी दुपारी ३ च्या दरम्यान मल्लिकार्जुन खरगे हे सोलापूरवरून बेंगळूरूला गेले होते. यावेळी ८ जून २०२३ रोजी राधाकृष्ण विखे पाटील यांनी मल्लिकार्जुन खरगे यांची गुप्त भेट घेतली होती. त्यांच्यामध्ये काय चर्चा झाली, हे मी आता सांगत नाही. मात्र, भाजपाची माणसं काँग्रेसला जाऊन भेटत आहेत आणि काँग्रेसवाले गाफील राहत आहेत'', असा मोठा गौप्यस्फोट प्रकाश आंबेडकर यांनी नगरच्या सभेत बोलताना केला.

बाळासाहेब थोरातांबाबत काय म्हणाले?

प्रकाश आंबेडकर यांनी या सभेत बोलताना काँग्रेसच्या नेत्यांना प्रत्युत्तर दिले. तसेच बाळासाहेब थोरात यांच्याबाबत बोलताना ते म्हणाले, ''मी बाळासाहेब थोरात यांना सांगू इच्छित आहे की, ही परिस्थिती चांगली नाही. आमच्यावर टीका करण्यापेक्षा तिकडे तुमचा स्वत:चा पक्ष वाचवा, नाहीतर तुमच्या हातातील काँग्रेस पक्ष हा कधी राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हातात जाईल, ते सांगता येत नाही'', असा खोचक टोला प्रकाश आंबेडकर यांनी बाळासाहेब थोरात यांना लगावला.

पुण्यात दुसरा मोठा गौप्यस्फोट करणार

नगर दक्षिण लोकसभेसाठी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार दिलीप खेडकर यांच्या प्रचाराची सभा आज नगरमध्ये पार पडली. यावेळी या सभेत बोलताना प्रकाश आंबेडकर यांनी काँग्रेसवर टीका केली. तसेच राधाकृष्ण विखे पाटील आणि सुजय विखे पाटली यांच्याबाबत गौप्यस्फोट केला. यानंतर याच सभेच बोलताना आपण आणखी एक गौप्यस्फोट करणार असून हा गौप्यस्फोट नगरमध्ये नाही तर पुण्यात करणार असल्याचे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे. प्रकाश आंबेडकर यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# 'इंडिया फ्रंट'च्या एकजुटीमुळे 'कोथरूड' काँग्रेससाठी 'लाख' मोलाचा ठरणार : चंदूशेठ कदम



थेट मुद्द्यावर...
- प्रवीण पगारे

**पुणे** : कसबा विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत ' एकी'मुळे भाजपचा पराभव सहजशक्य आहे,यावर शिक्कामोर्तब झाले शिवाय भाजपलाही अहंकार कसा अंगलट येऊ शकतो याचा धडाही मिळाला. आता इंडिया फ्रंटच्याएकजुटीमुळे 'कसब्या'ची पुनरावृत्ती पुणे लोकसभा मतदार संघात निश्चितच होणार आहे. विशेष म्हणजे भाजपचा हक्काचा कोथरूड विधानसभा मतदारसंघ महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांना 'लाख' मोलाचा ठरणार असल्याचे भाष्य महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव व माजी नगरसेवक रामचंद्र उर्फ चंदूशेठ कदम यांनी केले आहे.

कसबा विधानसभा मतदारसंघ हा भाजपचा बालेकिल्ला ;पण मतदारांना गृहीत धरणे हेच भाजपला महागात पडले. दिग्गज नेत्यांनी तळ ठोकला, सभा घेतल्या,मोदींच्या नावाचा जयघोष केला तरीही हक्काचा मतदारसंघ भाजपच्या हातातून निसटला आणि व्यक्तिगत पातळीवर ' मी समाजासाठी, समाज माझ्यासाठी' हे ब्रीदवाक्य घेऊन समाजकारण करणाऱ्या रवींद्र धंगेकर यांनी 'कसब्या'तील मतदारांच्या मनात घर केले. इतकेच नाहीतर संपूर्ण पुणे शहरातील घराघरात धंगेकरांचे नाव आपसूक पोहचले.राज्यात सत्तेचा सातबारा ताब्यात असणाऱ्या सत्ताधाऱ्यांना ' मी पणा' नडला आणि दिल्लीश्वरांपर्यंत कसब्यातील पराभवाचा धक्का पोहोचला. हा धक्का देणारे विद्यमान आमदार रविंद्र धंगेकर आता पुणे लोकसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या आखाड्यात उतरले आहेत. सद्यस्थितीत विधानसभा मतदारसंघ निहाय समीकरणे बदलण्याची भीती महाविकास आघाडीच्या एकीमुळे भाजपला भेडसावत आहे. महाविकास आघाडीतील काँग्रेसला पुन्हा पुणे लोकसभा मतदारसंघ काबीज करण्याची संधी चालून आली आहे.याच पार्श्वभूमीवर कोथरूड विधानसभा मतदारसंघ, जो भाजपचा बालेकिल्ला आहे. तिथे इंडिया फ्रंटचा प्रचार एकजुटीने सुरु आहे. प्रत्येक कार्यकर्ता घराघरात पोहचत आहे. त्यामुळे या मतदारसंघात यंदा समीकरणे बदलणार का ? यावर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव चंदूशेठ कदम यांच्याशी संवाद साधला असता,त्यांनी राज्यातील सत्तेचा विचित्र प्रयोग हा मतदारांच्या पचनी पडलेला नाही, याकडे लक्ष वेधले. ते म्हणाले ,गत लोकसभा निवडणुकीतील मतांची टक्केवारी पाहिल्यास यंदा कोथरूड विधानसभा मतदारसंघात काँग्रेस मुसंडी मारणार असा आशावाद निश्चित आहे. कारण इंडिया फ्रंटचा एकजुटीने प्रचार सुरु आहे. प्रभागनिहाय नियोजन करून प्रत्येक कार्यकर्ता हा रस्त्यावर उतरून प्रामाणिकपणे प्रचार करत आहे. घराघरात पोहचत आहे. मतदारांना पक्षाची भूमिका सांगत आहे. भाजपने केलेल्या 'फोडाफोडी' च्या राजकारणामुळे मतदारांमध्ये संतप्त प्रतिक्रिया आहेत.मागीलवेळी मोदी लाट होती मात्र यंदा ती प्रभावहीन ठरेल अशी स्थिती आहे. कोथरूड मतदारसंघात इंडिया फ्रंटची एकजुटच यंदा बदल घडवणार आहे. सध्या आम्ही प्रभाग निहाय नियोजनपूर्वक प्रचार करत आहोत. संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढत आहोत. माजी मंत्री शशिकांत सुतार, माजी आमदार चंद्रकांत मोकाटे, पृथ्वीराज सुतार, शिवसेना शहराध्यक्ष गजानन थरकुडे,विजय खळदकर, तानाजी निम्हण, शिवा मंत्री, दत्ता जाधव, स्वप्नील दुधाने, उमेश कंधारे, डॉ. अभिजीत मोरे, ॲड अमोल काळे, नेटके, गोसावी, भगवानराव कडू, संदीप मोकाटे, राजू मगर, महेश ठाकूर, राजेश पळसकर, रामदास थरकुडे, गिरीश गुरनानी, ज्योतीताई सूर्यवंशी, कानूभाऊ साळुंखे, शिवाजी सोनार, पांडुरंग गायकवाड, सोमनाथ पवार, गणेश मारणे, अनिकेत कुरपे, किशोर मारणे, दिलीप गायकवाड, नितीन पवार, पुरुषोत्तम विटेकर, मनिषाताई करपे, रवींद्र माझिरे, किशोर कांबळे, सविताताई मते, संतोष डोख, सौ दिपाली डोख, जीवन चाकणकर, रोहित धेंडे, आण्णा राऊत, शीलाताई राऊत, यशराज पारखी, मंगेश निम्हण, संतोष तोंडे, योगेश मोकाटे, भारत सुतार, राज जाधव, आकाश माने, योगेश सुतार, अनिल घोलप,किशोर मारणे असे असे इंडिया फ्रंटमधील प्रत्येकजण परिश्रम घेत आहेत. वस्ती भागात आम्ही केलेली कामे हीच जमेची ठरणार आहे. असेही चंदूशेठ कदम यांनी सांगितले.

## मतांचे समीकरण अनुकूल

**गत लोकसभा निवडणुकीत स्व. गिरीश बापट यांना कोथरूड या भाजपच्या पारंपरिक बालेकिल्ल्यातून एक लाख ४८ हजार ५७० मते मिळाली होती तर मोहन जोशी यांना ४२ हजार ३७४ मते मिळाली. कोथरूडमधून स्व. गिरीश बापट यांना एक लाख सहा हजार १९६ मतांचे मताधिक्य मिळाले होते. हे बापट यांना मिळालेले सर्वाधिक मताधिक्य होते.पण विधानसभा निवडणुकीत मनसेचे किशोर शिंदे यांना ८० हजार मते मिळाली मात्र विद्यमान आमदार चंद्रकांत पाटील यांना २५ हजार ४९५ चे मताधिक्य मिळाले.हाच फरक महत्वाचा आहे.यंदा या मतदारसंघात ४ लाख १० हजार ६३४ मतदारसंख्या आहे. त्यामुळे काँग्रेसला पडलेली ४२ हजार ३७४ मते आणि शिवसेनेची ३५ हजार मते तसेच घटक पक्षातील अन्य मतांचे समीकरण हे महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या पथ्यावर पडणार आहे. साधारण एक लाखांवर मते ही महाविकास आघाडीच्या पारड्यात जाणार असल्याचा ठाम दावा चंदूशेठ कदम यांचा आहे.**

# देशवासियांसमोर मोदींचा खोटेपणा उघडा पडलाय - ॲड. असीम सरोदे

## पिंपरी-चिंचवडमधील असंख्य वैद्यकीय व्यावसायिकांचे संजोग वाघेरेंना समर्थन

**पिंपरी/प्रतिनिधी**

लोकांनी ही निवडणूक हातामध्ये घेतलेली आहे. महाराष्ट्रातील आणि देशातील जनतेला नरेंद्र मोदी यांचा खोटेपणा समजला आहे. भाजपच्या सरकारने नवीन कायदे करून इलेक्ट्रॉल बॉण्डसारखा सर्वात मोठा राजकीय घोटाळा केला आहे. २०१४ मध्ये त्यांच्या खोट्या आश्वासनांना भुलून सुशिक्षित लोकांनी केलेली चूक या लोकसभा निवडणुकीत सुधारावी लागेल. देशासाठी आणि संविधानासाठी महाविकास आघाडीला मतदान करा, असे आवाहन निर्भय बनो अभियानाचे संयोजक तथा विधीज्ञ ॲड. असिम सरोदे यांनी केले.



मावळ लोकसभेचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या समर्थनार्थ चिंचवडमध्ये वैद्यकीय व्यावसायिकांचा मेळावा पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. या वेळी उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्यासह शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले, महिला संघटिका सुलभा उबाळे, सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे, मारुती भापकर, आम आदमी पक्षाचे पदवीधर प्रदेशाध्यक्ष चेतन बेंद्रे, पिंपरी चिंचवड डॉक्टर सेलचे डॉ. सुनील जगताप, डॉ. मनोज राका, मनिषा गरुड, डॉ. अर्चना वाघेरे, डॉ. दत्तात्रय कोकाटे, डॉ. अभय तांबिले, डॉ. वैशाली कुलथे, डॉ. अनिकेत अमृतकर, डॉ. सुजित पोखरकर, डॉ. प्रफुल पगारे यांच्यासह शहरातील विविध डॉक्टर संस्था व संघटना यांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ॲड. असीम सरोदे पुढे म्हणाले, मोदींना पराभव दिसू लागलेला आहे. म्हणून ते आता उद्धव ठाकरे यांचे नाव घेऊन जवळीक साधण्याचा प्रयत्न करीत आहेत. कोणत्याही मार्गाने निवडणूक जिंकण्यासाठी काहीही करुन त्यांनी राजकारण खराब केले. भाजपमधील चांगल्या विचारांच्या लोकांना देखील ते पुन्हा सत्तेवर नको आहेत. अनेक उमेदवार मोदींची सभा नको म्हणतात. अतिशय चुकीचे राजकारण त्यांनी केलं आहे. महाराष्ट्रात फिरल्यानंतर जनता भाजप आणि नरेंद्र मोदी यांना कंटाळलेली आहे, हे लक्षात येते. तर फडणवीसांना त्यांनी केलेल्या राजकीय पातकासाठी जनता माफ करणार नाही. राज्यात भाजपला लोकसभेच्या खूप जागा मिळत आहेत. या निवडणुकीचे महत्त्व ओळखून सर्वांनी मावळमध्ये महाविकास आघाडीला व संजोग वाघेरे यांना मतदान करून विजयी करा. आजच्या घडीला त्यांच्यासारख्या विनम्र, संवेदनशील व्यक्तींची राजकारणात गरज आहे, असेही असीम सरोदे म्हणाले. सर्वसामान्यांच्या प्रश्नांचा व त्यांच्या हिताचा विचार इंडिया आघाडीने मांडला असून २५ लाखांचा कॅशलेस विम ही त्यांची घोषणा महत्वाची ठरेल, असेही ते म्हणाले.

उमेदवार संजोग वाघेरे पाटील म्हणाले, दहा वर्षांत देशाला वेगळ्या मार्गाला घेऊन जाण्याचे काम सुरू आहे. नोक-या कमी झाल्या आहेत. वैद्यकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कंत्राटीकरण वाढले. योजनांची अंमलबजावणी होत नाही. वैद्यकीय क्षेत्रातील व्यक्तींना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. नवीन सुधारणांसाठी आणि तुमचे प्रश्न मांडण्यासाठी तुमचा प्रतिनिधी म्हणून निवडून द्या, असे आवाहन त्यांनी केले. कोरोना काळात महाराष्ट्राचे कुटुंबप्रमुख म्हणून पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी जबाबदारी सांभाळली. हे डॉक्टर अधिक चांगल्या प्रकारे समजू शकतात. त्यांना साथ देण्यासाठी मशाल चिन्ह लक्षात ठेवा, असेही ते म्हणाले.

या बैठकीत वैद्यकीय क्षेत्रातील पदाधिकारी व डॉक्टर यांनी सरकारी योजनांमधील त्रूटी व स्थानिक प्रशासनाकडून होणारी अडवणूक याबाबत समस्या मांडल्या. यावरून संजोग वाघेरे पाटील यांनी लक्ष घालून त्या सोडविण्यासाठी कायम सोबत राहण्याचे आश्वासन दिले. यावेळी उपस्थितांना ॲड. सचिन भोसले, सूलभा उबाळे, मानव कांबळे, मारुती भापकर यांनी मनोगत व्यक्त करुन संजोग वाघेरे यांना विजयी करण्याचे आवाहन केले.

या बैठकीचे संयोजन आकाश वाघेरे यांनी केले. मनीषा गरुड व अनिकेत अमृतकर यांनी सूत्रसंचालन केले. तर डॉ. अर्चना वाघेरे यांनी आभार मानले.

# श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी मावळमध्ये भाजपचा 'डोअर टू डोअर' प्रचार

**तळेगाव दाभाडे / प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघासाठी चौथ्या टप्प्यात १३ मे रोजी मतदान होणार आहे. प्रचारासाठी शेवटचा एक आठवडा शिल्लक आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांनी 'डोअर टू डोअर' प्रचार मोहीम हाती घेतली असल्याची माहिती भाजपचे मावळ विधानसभा निवडणूक प्रमुख रवींद्र भेगडे यांनी दिली.

मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना- भाजप- राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय- रासप- मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी भाजपने मावळ तालुक्यात आघाडी घेतली आहे. बारणे यांच्या प्रचारासाठी मावळ विधानसभा मतदार संघातील सर्व ३८१ बूथवर भारतीय जनता पार्टी व महायुती कडून 'डोअर टू डोअर' प्रचार करून नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी श्रीरंग बारणे यांना मत देऊन प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन नागरिकांना केले जात आहे.

- **सोमवारी देवेंद्र फडणवीस यांची सभा**

महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सोमवारी (दि. ६) जाहीर सभा होणार आहे. ही सभा कापसे लॉन्स, रहाटणी येथे सोमवारी दुपारी दोन वाजता होणार आहे. मावळ विधानसभा मतदार संघातील महायुतीच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने या प्रचार सभेस उपस्थित राहण्याचे आवाहन देखील रविंद्र भेगडे यांनी केले आहे.



# महावितरणच्या उत्कृष्ट ५६ जनमित्रांचा सहकुटुंबासह गौरव

## वीजग्राहकांचे तत्पर समाधान हीच सेवेची खरी पावती : मुख्य अभियंता राजेंद्र पवार

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे** : 'सुरळीत वीजपुरवठा व विविध ग्राहक सेवेचे कर्तव्य चोखपणे बजावताना वीजग्राहकांचे तत्पर समाधान करणे हीच खरी महावितरणच्या सेवेची पावती आहे. वीजक्षेत्रात काल केलेल्या कामगिरीवर आज तगू शकत नाही हे वास्तव आहे. त्यामुळे तत्पर ग्राहक सेवा देण्यासाठी कायम सजग व सज्ज राहावे' असे आवाहन असे आवाहन पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी केले.



महावितरणच्या पुणे परिमंडलातील सन २०२३-२४ मध्ये उत्कृष्ट ग्राहकसेवा, सुरळीत वीजपुरवठा, वीजवाहिन्या व उपकेंद्रांची विनाअपघात तांत्रिक देखभाल व दुरुस्ती करणाऱ्या उत्कृष्ट १२ यंत्रचालक व ४४ तांत्रिक कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सहकुटुंब गौरविण्यात आले. रास्तापेठ येथील प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमात मुख्य अभियंता राजेंद्र पवार बोलत होते. यावेळी अधीक्षक अभियंता सर्वश्री युवराज जरग, संजीव राठोड, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी शिरीष काटकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी स्थापत्य विभागातील तीन उत्कृष्ट कर्मचाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

पुणे परिमंडलातील विभागनिहाय उत्कृष्ट तांत्रिक कर्मचारी पुढीलप्रमाणे– रोहिदास मेमाने, प्रवीण जगताप, श्रीनिवास दुधभाते, नागेश बाबर (बंडगार्डन विभाग), बाळकृष्ण चव्हाण, दीपक सैंदाणे, गोरखनाथ खोचे, नंदकिशोर गायकवाड (नगररोड विभाग), भगवान अहिरे, रत्नाकर पांचाळ, दिगंबर गजेले, मधु हरी पवार (पदमावती विभाग), सुरेश सोनवणे, दीपक गायकवाड, साधना कोवे, प्रमोद भाकरे, (पर्वती विभाग), विवेक पाटील, विलास हिरवे, अमोल कोकरे, लक्ष्मण गायकवाड, भाग्यश्री मडावी (रास्तापेठ विभाग), अतुल ढवळे, संभाजी थोरवे, खलील तांबोळी, प्रशांत बनसोड, नीलेश आरुडे, गंगाराम विरणक (मंचर विभाग), गणेश भोईटे, नामदेव मोरे, प्रवीण कापडे, मुस्तफा शेख, किशोर वाळूंजकर (मुळशी विभाग), योगेश पावडे, गणेश कदम, अनिल पाटील, पंकज येवले, काशिनाथ सरोगदे, पंढरीनाथ सवाणे, चंद्रभान ढवळे (राजगुरूनगर विभाग), हणमंत शिंदे, अजित मस्के, विठ्ठल गणगे, विलास चव्हाण (भोसरी विभाग), भगवान मोरे, दीपक शेंडगे, श्रावण कांबळे, सुग्रीव ढेकणे (कोथरूड विभाग), अजय सोनवणे, वेंकटरायप्पा देवराजू, आवेज मुजावर, सुरेश कुऱ्हाडे (पिंपरी विभाग), निवृत्ती लोहार, सुनील कुमेरिया, सचिन वराडे, रूपाली कांबळे, दीपक रसाळ (शिवाजीनगर विभाग) आणि शैलेंद्र भालेराव, सुजित विभुते, हरिश्चंद्र गुंजाळ (स्थापत्य).

## मतदार आणि निवडणूक कर्मचाऱ्यांच्या आरोग्यासाठी मतदान केंद्रावर सुविधा

**पुणे** : उन्हाळ्यातील वाढते तापमान लक्षात घेता निवडणुकीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी तसेच मतदानासाठी येणाऱ्या मतदारांसाठी १ हजार ७२४ प्रथमोपचार पेट्या आणि प्रत्येक मतदान केंद्रासाठी १० ओआरएसच्या पाकिटांचे वितरण कृषी महाविद्यालय येथील वितरण केंद्रातून करण्यात आले.

मतदान केंद्रावर काही दुर्घटना उद्भवल्यास तात्काळ प्राथमिक उपचार देण्याच्या भारत निवडणूक आयोगाच्या सूचना आहेत. त्याअनुषंगाने बारामती लोकसभा मतदार संघातील दौंड विधानसभा मतदार संघासाठी २३२, इंदापूर २५२, बारामती २८०, पुरंदर २४४, भोर ५२५ व खडकवासला १९१ याप्रमाणे १ हजार ७२४ कीटचे वितरण करण्यात आले. तर २ हजार ५१६ मतदान केंद्राना २५१६० ओआरएसच्या पाकिटांचे वितरण करण्यात आले.

# व्हायोलीन आणि हार्मोनिअमच्या 'आनंद तरंग'मध्ये रसिक मंत्रमुग्ध!




**पुणे** : भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार उपक्रमांतर्गत ' आनंद तरंग ' या गाण्यांच्या सहवादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन दि.४ मे २०२४ रोजी करण्यात आले होते.

'स्वरगंध, पुणे' प्रस्तुत या कार्यक्रमात डॉ.नीलिमा राडकर या व्हायोलिनमधून आणि माधवी करंदीकर यांनी हार्मो नियममधून शास्त्रीय संगीतावर आधारित सुप्रसिद्ध चित्रपटगीते , भावगीते सहवादनातून सादर केली, आणि रसिक मंत्रमुग्ध झाले. रवींद्र क्षीरसागर,जितेंद्र पावगी(तबला),नरेंद्र काळे (तालवाद्य) यांनी साथसंगत केली. यशश्री पुणेकर यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले.

कार्यक्रमाची सुरुवात 'तुज मागतो मी आता ' या यमन रागातील गणेश स्तवनाने करण्यात आली. यानंतर चितचोर चित्रपटातील 'जब दीप जले 'यमन रागातील 'जा रे बदरा बैरी जा ,' दिवसामागुनी दिवस ' हे ग.दि. माडगूळकर यांचे गीत , ' तोरा मन दरपन ' हे शाहना कानडा मधील गीत सादर झाले. मधमाद सारंग रागावर आधारीत 'दुख भरे दीन ' , गौड मल्हार रागावर आधारीत बरसात की रात या चित्रपटातील 'गरजत बरसत ' ,खमाज रागातील मेडले ' दिल है छोटासा, ' बनके पंछी, ओ सजना, पिया तोसे नयना, ' ही मेडले सादर झाली.

खमाज रागातील ठुमरी बाज असलेले उपशास्त्रीय संगीतावर आधारीत नवरंग चित्रपटातील 'आ दिलसे ' , कव्वाली बाज असलेले ' ना तो कारवाँ की तलाश है ' आदींसह भैरवीने कार्यक्रमाची सांगता झाली.

# ग्रामीण भागातून उसाच्या रसाचा लाकडी घाणा लुप्त होण्याच्या मार्गावर

- **विविध शीतपेयांमुळे रसवंतीगृहाकडे ग्राहकांचा कल कमी**

**राजगुरूनगर (वा.)** : पूर्वी बैलाच्या किंवा मनुष्याच्या मदतीने लाकडी घाण्यावर उसाचा रस काढण्याचा व्यवसाय ग्रामीण भागातील बाजारपेठेत दिसून येत असे. आज ग्रामीण भागातून लाकडी घाणे जवळ जवळ लुप्त झाले असून यंत्राच्या साहाय्याने उसाचा रस काढला जातो. विशेष बाब म्हणजे, उसाच्या रसाची चव या यंत्रामुळे बदलली आहे. लाकडी घाण्यातून काढला गेलेला रस शुद्ध व चवदार असायचा. मात्र, यांत्रिक युगात मानवी व लाकडी घाण्याची जागा आता आधुनिक यंत्रसामग्रीने घेतली आहे. आता तर यंत्राच्या सहाय्याने काढलेला रस गल्लीबोळात पोहोचलेला आहे. मात्र, मानवी व लाकडी घाण्यावरून काढलेल्या रसाचा स्वाद हा यांत्रिक रस देऊ शकत नाही. त्यामुळे गरिबांच्या या मधुर पेयाची ती जुनी चव इतिहासजमा होत असल्याचे दिसून येत आहे.






आधुनिक यंत्रसामग्रीद्वारे रस काढताना रसवंतीचालक तर दुसरीकडे लुप्त होत चाललेला उस काढण्याचा लाकडी घाणा.

दिवसेंदिवस उन्हाचा कडाका वाढला आहे. त्यामुळे शरीराची अक्षरशः लाहीलाही होऊ लागली आहे. या भयंकर उकाड्यापासून शरीराला थंडावा मिळावा यासाठी सर्वांची पावले आपसूकच रसवंतीकडे वळू लागली आहेत. परंतु, लाकडी घाण्यावरून काढलेल्या रसामध्ये जो स्वाद होता. तो स्वाद या यंत्राच्या साहाय्याने काढलेल्या रसाला येत नसल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून ऐकायला मिळत आहे. मात्र, जीवाची होणारी लाहीलाही थांबविण्यासाठी यंत्रातूनही निघालेला रस नाईलाजास्तव प्यावाच लागतो. एके काळी ग्रामीण भागातील सर्वाधिक खपाचे मधुर शीतपेय म्हणून ओळखला जाणारा उसाचा रस बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या विविध शीतपेयांमुळे मागे पडलेला दिसत आहे. विद्युत यंत्राच्या सहाय्याने लोखंडी यंत्रातून निघणाऱ्या ऊसाच्या रसापेक्षा लाकडाच्या घाण्यातून निघणारा ऊसाचा रस अधिक चवदार असल्याच्या प्रतिक्रिया आजही ग्रामीण भागात उमटतात.

उन्हाळा सुरू होताच शहरी भाग व तालुक्याच्या ठिकाणासह अनेक महत्त्वाच्या गावांत रसवंत्या थाटल्या जातात. या सर्व रसवंत्यांमध्ये विद्युत मोटारीवर चालणाऱ्या लोखंडी यंत्रावरून ऊसाचा रस काढण्यात येतो. अतिशय कमी जागेत हे यंत्र बसविले जात असल्याने व्यावसायिकाला ते सोयीचे होत असते. या रसात बर्फ टाकल्याने ग्राहकांना थंड रस मिळतो. त्यात लिंबाचा समावेश असल्याने रसाच्या चवीत अधिक भर पडते. या रसाचे चलन शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात अधिक असते. थंड शीतपेयाच्या किमतीच्या तुलनेत रस पिणे अधिक परवडत असल्याचे ग्राहकांचे मत आहे.

पूर्वी बैलांच्या किंवा मानवाच्या सहाय्याने लाकडी घाण्यातून निघणाऱ्या रसापासून ग्राहकांना जे समाधान मिळत होते ते समाधान यंत्राच्या सहाय्याने काढलेल्या ऊसाच्या रसातून मिळत नसले तरी आर्थिकदृष्ट्या तो परवडणारा असल्याचे सांगितले जाते. आता बैलांच्या किंमती वाढल्याने व बैल हाकणाऱ्या माणसाला मजुरी द्यावी लागत असल्यामुळे यातून सुटका मिळविण्यासाठी यंत्राचा वापर केला जातो. ते यंत्र शहरातील ग्रामीण बाजारपेठेत गल्ली बोळात फिरवताना अनेक रसविक्रेते दिसून येतात.

सध्या काळाच्या ओघात लाकडी घाणा लुप्त होताना दिसत आहे. पूर्वी या घाण्यावर खुळखुळ्याचा वापर होत असायचा. यामुळे ग्राहकांना हे खुळखुळ्याचा आवाज आकर्षित करून उसाच्या रसाकडे येण्यास भाग पाडायचा. उन्हाळ्यात याला प्रचंड मागणी असायची. मात्र, आज वेगवेगळी शीतपेये बाजारात उपलब्ध असल्याने उसाच्या रसाची मागणी काहीअंशी कमी होऊ लागली असल्याचे मत रसविक्रेता भरत बळीराम खेडकर (पाथर्डी) यांनी सांगितले.

# नाशिकमध्ये शेकडो वर्षे जुन्या वृक्षांची कत्तल

**नाशिक/प्रतिनिधी**



शहराच्या सौंदर्यात दिमाखदारपणे भर पाडणाऱ्या आणि शेकडो वर्षांपासून येथिल पर्यावरणाचा भाग असलेल्या वृक्षांची सर्रास कत्तल करणे चालू आहे.

विकासकामांच्या नावाखाली शहराचे सौंदर्य भकास करण्याचा धडाका काही मोजक्या कंत्राटधार्जिण्या करंट्या मानसिकतेने नाशिक शहरात चालविला आहे.

येथिल नाशिक पुणे महामार्गावरिल द्वारका चौक ते बिटको चौक या दरम्यान असलेल्या वड, पिंपळ, चिंच, कडूलिंब अशा पर्यावरणाच्या संतूलनासाठी महत्वाची भूमिका पार पाडणाऱ्या आणि शहराच्या सौंदर्यात भर पाडणाऱ्या शेकडो वर्षे जुन्या वृक्षांची पद्धतशीरपणे कत्तल केली जात आहे.

या वृक्षकत्तलीकडे येथिल जिल्हा प्रशासन, पर्यावरणाच्या संवर्धनाची जबाबदारी असलेल्या यंत्रणा जाणीवपूर्वक दुर्लक्ष करित असल्याचे दिसून येत आहे, त्यामुळे पर्यावरणप्रेमींमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे.

# मतदान केंद्रांवरील 'पाळणाघरे' सज्ज ठेवा जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर** : मतदान केंद्रांवर मतदानासाठी येणाऱ्या मातांची बालके सांभाळण्यासाठी मतदान केंद्रांवर पाळणाघरांची सुविधा उपलब्ध करावयाची आहे. ही जबाबदारी आरोग्य विभाग व महिला व बालकल्याण विभाग यांनी संयुक्तपणे पार पाडावयाची असून ही पाळणाघरे मतदानाच्या आदल्यादिवशी म्हणजे दि.१२ रोजी सज्ज असायला हवी, यादृष्टीने नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज सर्व संबंधित यंत्रणांना दिले.

मतदान केंद्रांवर द्यावयाच्या सुविधांबाबत आज जिल्हाधिकारी स्वामी यांनी आज तालुकास्तरीय यंत्रणांसमवेत दूरदृष्यप्रणालीद्वारे आढावा घेतला. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दयानंद मोतीपवळे, जिल्हा महिला बालविकास अधिकारी सुवर्णा जाधव तसेच अन्य विभागप्रमुख तसेच तालुकास्तरीय अधिकारी सहभागी झाले होते.

मतदान केंद्रांवर उपलब्ध करावयाच्या पाळणाघरांमध्ये बालकांसाठी आहाराची सोय, पाणी, खेळणी यांच्या उपलब्धतेसह अंगणवाडी सेविका, सहाय्यक इ. यांनी उपस्थिती आवश्यक आहे. ही सगळी तयारी मतदानाच्या आदल्या दिवशी म्हणजे दि.१२ रोजी सायंकाळपर्यंत पूर्ण झाली पाहिजे. त्याचा आढावा तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी घेऊन तसा अहवाल जिल्हास्तरावर द्यावयाचा आहे, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. प्रत्येक पाळणाघरावर बालकांना द्यावयाचे पाणी तसेच अन्य आहार विषयक सुविधा उपलब्ध ठेवण्याविषयीही सुचना देण्यात आल्या. पाळणा घरातील तसेच मतदान केंद्रावरील अन्य सुविधांमध्ये नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांनी आपले स्वत:चे मतदानही करावयाचे आहे. त्यादृष्टीने त्यांना एक अन्य सहकारी ही बदलीसाठी उपलब्ध करुन देण्याचे नियोजन करण्यात आल्याचे संबंधितांनी सांगितले.

## वृध्देच्या हातातील ३ तोळ्याच्या बांगड्या लंपास

**पोलादपूर** : तालुक्यातील महालगूर येथील एका वृध्देच्या हातातील २ सोन्याच्या बांगड्या अज्ञात इसमाने चोरून नेल्याची घटना पोलादपूर एस.टी. स्थानकामध्ये घडली असून याप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२ मे २०२४ रोजी दुपारी पावणेचार वाजण्याच्या सुमारास सुलोचना सिताराम घाडगे (वय ६८ रा.महालगूर, ता.पोलादपूर) यांच्या हातातील दोन वापरत्या तीन तोळ्याच्या बांगड्या त्या एस.टी.बसमध्ये चढत असताना कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांच्या वृध्दापकाळाचा गैरफायदा घेऊन हातातून ओढून लंपास केल्या. तीन तोळे वजनाच्या फुलांची डिझाईन असलेल्या या जुन्या वापरत्या बांगड्यांची किंमत पोलीस तक्रारीत ४५ हजार रूपये नोंद करण्यात आली असून सध्याच्या बाजारभावानुसार २.७५ लाख रूपये किंमत होत आहे. याप्रकरणी पोलीस हवालदार बामणे हे पोलीस निरिक्षक अनिल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास करीत आहेत.

# विद्यार्थ्यांच्या तक्रारींवर निघणार जलदगतीने मार्ग

## मुंबई विद्यापीठाचे महत्वाचे पाऊल



**मुंबई** : परीक्षेचा वेळा, निकालास लागणार उशीर, त्यामुळे पुढच्या प्रवेशावर होणारा परिणाम अशा अनेक अडचणींना मुंबई विद्यापीठाचे विद्यार्थी सामोरे जात असतात. दरम्यान मुंबई विद्यापीठाने यासंदर्भात महत्वाचे पाऊल उचलले आहे. विद्यार्थ्यांच्या तक्रारींचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व अनुषंगिक बाबींशी निगडीत प्रश्न, शंका, समस्या यांचे निरसन करण्यासाठी विद्यार्थी संवाद हा उपक्रम सुरु केला. मुंबई विद्यापीठाचा हा उपक्रम विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रभावी माध्यम ठरत आहे.

निकाल, राखीव निकाल, पुनर्मूल्यांकन, छायांकीत प्रत आणि गुणपत्रिका अशा अनुषंगिक तक्रारींचे निवारण जलदगतीने आणि तात्काळ होत आहे. आज आयोजित केलेल्या तिसऱ्या विद्यार्थी संवाद उपक्रमाच्या माध्यमातून एकूण १४ तक्रारींचे निवारण करण्यात आले. यामध्ये राखीव निकाल, पुनर्मूल्यांकनाचे निकाल, तात्पुरते पदवी प्रमाणपत्र आणि गुणपत्रिका अशा अनुषंगिक विषयांचा समावेश होता.

विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी आयोजित आजच्या विद्यार्थी संवाद कार्यक्रमासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालिका डॉ. पूजा रौंदळे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सुनील पाटील यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी संकुलातील छत्रपती शिवाजी महाराज भवन (नवीन परीक्षा भवन) येथे आज या कार्यक्रमाचे करण्यात आले होते.

**२०२४ मध्ये जास्त पगार देणाऱ्या ९ नोकऱ्या**

आज १४ विद्यार्थ्यांच्या तक्रारींमध्ये बीएमएएस राखीव निकाल, एमएससी बोयोटेक सत्र ४ चा निकाल, अभियांत्रिकी सत्र २ राखीव निकाल, एलएलएम सत्र १ राखीव निकाल, संगणक शास्त्र सत्र दोन पुनर्मूल्यांकन निकाल, पदवी प्रमाणपत्र आणि गुणपत्रिका अशा अनुषंगिक तक्रारी विद्यार्थ्यांनी उपस्थित केल्या.

या सर्व तक्रारींचे निवारण विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत करण्यात आले. ज्या विद्यार्थ्यांचे निकाल राखीव होते अशा विद्यार्थ्यांना निकाल जाहीर झाल्याचे पत्र देण्यात आले, तर काही विद्यार्थ्यांना गुणपत्रिका देण्यात आल्या.

बारावीनंतर फार्मसी केलेय? जाणून घ्या सरकारी नोकरीचे पर्याय

मुंबई विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभाग आणि संलग्नित महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तक्रारींचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी महिन्याच्या पहिल्या आणि तिसऱ्या बुधवारी विद्यापीठात विद्यार्थी संवाद उपक्रमाचे आयोजन केले जात आहे. या उपक्रमातील पुढील संवादाची तारीख विद्यापीठाकडून लवकरच जाहीर केली जाणार आहे.

विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यासाठी विद्यापीठाने हा उपक्रम सुरू केला आहे. मागील तीन उपक्रमातून यास उत्तम प्रतिसाद मिळत आहे. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांच्या समस्येवर जलदगतीने तोडगा काढला जात असल्याने त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येणारा आनंद आणि समाधान विद्यापीठ प्रशासनाला अतिशय महत्वाचा वाटत असल्याची प्रतिक्रिया मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी दिली.

# मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी मतदान केंद्र पातळीवर गृहभेटीवर देण्यात येतोय भर

**धुळे** : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने ०२-धुळे लोकसभा मतदार संघामध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरीता मतदान केंद्राच्या क्षेत्रात गृहभेटी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमातंर्गत आज धुळे तालुक्यातील वडगाव येथे निवडणूक अधिकारी, कर्मचारी यांनी गृहभेट देऊन मतदारांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येत आहे.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांनी गृहभेटी उपक्रम राबविण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा स्वीप नोडल अधिकारी विशाल नरवाडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब अकलाडे, तहसिलदार अरुण शेवाळे, शिक्षणाधिकारी सुरेखा देवरे, गट विकास अधिकारी गणेश चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे तालुक्यातील एकूण ३७५ मतदान केंद्रांसाठी ४७ क्षेत्रीय अधिकाऱ्यांना संपर्क अधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे.

एका क्षेत्रीय अधिकाऱ्याकडे साधारणपणे आठ ते दहा मतदान केंद्रे देण्यात आले असून मतदान केंद्राच्या क्षेत्रात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचे सहशिक्षक, ग्रामसेवक, तलाठी, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेवक, पोलीस पाटील, आशा वर्कर, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा समावेश असलेल्या तीन ते चार व्यक्तींचा गट तयार करुन मतदान केंद्र पातळीवर मतदारांच्या घरोघरी जाऊन त्यांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करीत आहेत.

या उपक्रमांतर्गत आज धुळे तालुक्यातील वडगाव येथे संपर्क अधिकारी व्ही.बी. घुगे यांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (९६) प्रवीण ओतारी, शिक्षक हेमकांत अहिरराव व गावातील सर्व गावस्तरावरील कर्मचारी यांचे तीन ते चार जणांचे गट तयार करून कुटुंबांचे वाटप करून देण्यात आले व त्यानुसार प्रत्यक्ष गृहभेटी देऊन नागरीकांना लोकशाही शासनव्यवस्था अबाधित राहण्यासाठी मत देणे किती महत्वाचे आहे. मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य असून त्यामुळे देशाचा आणि ओघाने आपला कसा फायदा होणार आहे हे सांगून मतदारांमधील उदासिनता दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचेही संपर्क अधिकारी व्ही.बी. घुगे यांनी कळविले आहे.

# महाष्ट्राच्या हवामानात विचित्र बदल

**मुंबई** : महाष्ट्राच्या हवामानात विचित्र बदल पहायला मिळणार आहेत. येत्या चार पाच दिवसात वातावरणात कमालीचे बदल पहायला मिळणार आहेत. राज्यात अनेक ठिकाणी उष्ण आणि दमट वातारवरण राहणार आहे. तर, राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये सोसाट्याचा वार वाहणार आहे. तसेच अनेक ठिकाणी तुफान पाऊस पडणार आहे.

हवामान खात्यातर्फे पावासासंदर्भात अलर्ट जारी करण्यात आला आहे. मराठवाड्यात पुढील चार ते पाच दिवस वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मराठवाड्यातील एक, दोन जिल्ह्यात विजांचा कडकडाटासह पाऊस पडणार आहे. तर, काही ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. ४० किमी प्रतितास वेगानं सोसाट्याचा वारा वाहणार आहे. कोकणातील तुरळक क्षेत्रात उष्ण आणि दमट परिस्थिती राहण्याची शक्यता आहे असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

सामान्य रूग्णालयात सुसज्ज उष्माघात कक्ष

वाढते तापमान लक्षात घेता भंडारा जिल्हा सामान्य रूग्णालयात उपाययोजनेच्या दृष्टीने सुसज्ज उष्माघात कक्ष सुरू करण्यात आले. परंतु आतापर्यत एकही रुग्ण उपचारासाठी या कक्षात भरती झालेला नाही. एसी रुम, अत्याधुनिक सुविधेसह ८ खाटांचे सुसज्ज कक्ष रुग्णालयात सुरु करण्यात आलंय. या इमारतीतील प्रभाग क्रमांक ९ आणि १३ मध्ये प्रत्येकी ४ खाटांचा उष्माघात कक्ष सुरू करण्यात आले आहे. यातील एक महिलांसाठी आणि दुसरा पुरुषांसाठी आहे.

सांगली जिल्ह्यावर दुष्काळाचे सावट

सांगली जिल्ह्यात दुष्काळाचे सावट गंभीर बनलं आहे. जत तालुक्यातील उटगी येथील पाण्याचा स्त्रोत आटले आहेत. उटगी येथील तलाव बरोबर विहिरीतील पाणी आटले. सकाळ पासून उटगी तलावच्या ठिकाणी १४ ते १५ टँकर पाणी भरण्याच्या प्रतीक्षेत आहेत. दररोज ४० टँकर भरणाऱ्या उटगी येथे केवळ दिवसभरात

# कांद्यावरील निर्यातबंदी हटवण्यासाठी आम्ही पाठपुरावा केला

## फडणवीसांनी मानले केंद्र सरकारचे आभार



**नागपूर** : सध्या देशात लोकसभेच्या निवडणुका सुरू आहेत. या निवडणुकांच्या काळातच सरकारनं मोठा निर्णय घेतलाय. कांद्यावरील निर्यात बंदी मागे घेण्याची मागणी केंद्र सरकारनं मान्य केलीय. ''यासंदर्भातील मागणी आम्ही वारंवार केलेली त्यानंतर आता केंद्र सरकारने कांदा निर्यात बंदी मागे घेतली आहे''. त्यामुळे केंद्र सरकारचे आभारी असल्याचे मत, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलेय. ते आज नागपूर येथील निवासस्थानी बोलत होते.

कांद्याचे भाव वाढत असल्यामुळं त्याचा फायदा थेट शेतकऱ्यांना होणार आहे. मी, मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवारांनी यासंदर्भात केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. कांद्यावरील निर्यात बंदीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याची बाब, केंद्र सरकारला कळवली होती. त्याला प्रतिसाद मिळाला आहे. विरोधकांनी नेहमी याविषयी राजकारण करण्याचा प्रयत्न केला. केंद्र सरकार शेतकऱ्यांचं आणि सामान्य माणसाचे हित पाहते. - देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री

७ डिसेंबरला लागू केली होती निर्यातबंदी : केंद्र सरकारने ७ डिसेंबर २०२३ ला कांदा निर्यातबंदी लागू केली होती. याचा मोठा फटका शेतकरी आणि निर्यातदारांना बसला. यानंतर सरकारने छ्उएङ च्या माध्यमातून काही देशात निर्यात सुरू केली होती.

मात्र, याबाबत अनेक तक्रारी येत होत्या. तसंच निर्यातबंदी असताना काही ठिकाणी निर्यातदारांकडून फळांच्या बॉक्समध्ये कांद्याची तस्करी होत असल्याचे समोर आले होते. अखेर शुक्रवारी रात्री केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाने हा नवा निर्णय घेतला. या निर्णयाचे निर्यातदारांनी स्वागत केले असून, यामुळे शेतकऱ्यांनाही निश्चित फायदा होणार असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. मात्र निर्यात शुल्क कमी करण्याची मागणीही होत आहे.

# महाड-धुळे एसटी बससेवा ४ मे पासून सुरु

**पोलादपूर** : शहरात आणि तालुक्यातील खान्देशी रहिवाशांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी खान्देश एकता मंडळाची स्थापना करण्यात आली असून खान्देश विभागात महाडमधून अधिक बससेवा उपलब्ध व्हाव्यात अशी मंडळाची प्रमुख मागणी होती.

त्यानुसार मंडळाने महाड एस. टी. डेपोचे व्यवस्थापक रितेश फ ुलपगारे यांना सुमारे पाचशेहून अधिक खान्देशी रहिवाशांच्या सह्यांचे निवेदन देण्यात आले होते. यावर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे महाव्यवस्थापक (वाहतूक) यांनी कार्यवाही करत महाड ते धुळे आणि धुळे ते महाड या फेऱ्यांना मंजुरी दिली आहे. सदरच्या फेऱ्या या मे. साई गणेश टूर्स अँड ट्रॅव्हल्स यांच्यामार्फत सुरू होणार आहेत.

महाड ते धुळे आणि धुळे ते महाड या फेऱ्या दिनांक ४मे २०२४ पासून दररोज सकाळी ६ वाजून ४५ या वेळेत सोडण्याच्या सूचना सदरच्या विभागाने रायगड (पेण) विभाग नियंत्रक, मे. साई गणेश टूर्स अँड ट्रॅव्हल्स आणि धुळे विभागाचे वरिष्ठ आगार व्यवस्थापक यांना दिल्या आहेत. महाड-माणगांव ताम्हिणी मार्गे पुणे (शिवाजी नगर) - अहमदनगर-शिर्डी-कोपरगांव-येवला-मनमाड-मालेगांव-धुळे असा या बसचा पल्ला असणार आहे. धुळ्यावरून येणाऱ्या बसचा पल्ला देखील याचमार्गे महाडला येताना असणार आहे.

सध्या मे महिन्याच्या सुट्ट्यांचा हंगाम सुरू आहे आणि या धर्तीवर महाड ते धुळे ते महाड या बसेस सुरू होत असल्याने खान्देशी रहिवाशांकडून आनंद व्यक्त केला जात आहे.

या निर्णयामुळे खान्देश एकता मंडळाच्या एका प्रमुख मागणीला यश आले असून मंडळाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ तसेच महाड डेपो मॅनेजर यांचे आभार व्यक्त केले. यापुढेही खान्देश एकता मंडळ तालुक्यातील खान्देशी रहिवाशांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहील, असा विश्वास मंडळाच्यावतीने यावेळी व्यक्त करण्यात आला.

# संजय राऊत प्रकरणात उद्धव ठाकरे यांचा स्वप्ना पाटकर यांना धमकीचा फोन : डॉ. नीलम गोऱ्हे



**मुंबई** : सांताक्रूज भागातील सायकॉलॉजिस्ट स्वप्ना पाटकर यांना शिवीगाळ केल्या प्रकरणी खासदार संजय राऊत यांच्यावर कारवाई करण्यासंदर्भात लवकरच पावले उचलली जातील; मात्र संजय राऊत आणि स्वप्ना पाटकर यांच्या प्रकरणात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी स्वप्ना पाटकर यांना फोनवरून धमकी दिल्याचंही विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज (४ मे) पत्रकार परिषदेत सांगितले. स्वप्ना पाटकर यांना संरक्षण देऊन राऊत यांच्यावर कारवाईसाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

वरिष्ठांच्या पाठिंब्यामुळे त्रास देणे शक्य : पत्राचाळ प्रकरणातील साक्षीदार असलेल्या स्वप्ना पाटकर यांनी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्याकडे निवेदन दिले. या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, माझा आणि माझ्या कुटुंबीयांचा छळ करण्यात येत आहे. म ाझ्यावर दोन वेळा हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. तसंच माझा सातत्याने पाठलाग करण्यात येत आहे. नुकताच माझा बीकेसीवरून पाठलाग करण्यात आला असंही त्यांनी या निवेदनात म्हटलं आहे. संजय राऊत यांना त्यांच्या वरिष्ठांकडून मिळालेल्या पाठिंब्यामुळेच मला त्रास देणे त्यांना शक्य होत आहे. आपण त्यांच्या वरिष्ठांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; पण त्यांनी प्रतिसाद दिला नाही त्यांच्या पक्षाचे नेते चुकीच्या कृत्यांचं समर्थन करत आहेत. संजय राऊत यांचे वरिष्ठ आणि त्यांची टोळी फक्त धमक्या देण्यासाठी फोन करतात, समस्या सोडवण्यासाठी नाही असंही स्वप्ना पाटकर यांनी या निवेदनात म्हटले आहे.

उद्धव ठाकरे यांच्याकडून फोन : या संदर्भात बोलताना विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या की, स्वप्ना पाटकर यांना संरक्षण देण्यासाठी तसंच या प्रकरणात संजय राऊत यांच्यावर कारवाई होण्यासाठी आपण संबंधितांना सूचना देत आहोत. यापुढे त्यांच्यावर कारवाई होईल यासाठी आपण प्रयत्न करणार असून उद्धव ठाकरे यांनी या प्रकरणात स्वप्ना पाटकर यांना धमकी देण्यासाठी फोन केल्याचंही गोऱ्हे यांनी यावेळी सांगितलं. सरकारकडून विविध स्तरावर याची दखल घेतली जात आहे. गरज पडल्यास केंद्रीय स्तरावरसुद्धा आम्ही याबाबत पाठपुरावा करू आणि राऊत यांच्यावर कारवाई करण्यासाठी प्रयत्न करू असे त्या म्हणाल्या.

निवडणुका म्हणून आरोप नाही : लोकसभेच्या निवडणुका आहेत म्हणून संजय राऊत आणि उद्धव ठाकरे यांच्यावर आरोप करत नाही तर एका महिलेला तिच्या सुरक्षेचा हक्क मिळावा आणि या प्रकरणातील जे सत्य असेल ते लोकांसमोर येऊन दोषी व्यक्तीला शिक्षा व्हावी यासाठी हा सर्व खटाटोप असल्याचे डॉ. नीलम गोऱ्हे यांनी यावेळी सांगितले.

# विकास योजना राबविण्यासाठी धैर्यशील माने यांना खासदार करा : डॉ अरविंद माने

**शिरोळ** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देश हित साधण्यासाठी अनेक लोककल्याणकारी योजना राबवून शेवटच्या थरापर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले आहे तसेच जागतिक अर्थव्यवस्थेत भारताला अव्वल करण्यासाठी त्यांचा प्रयत्न सुरू आहे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हातात पुन्हा देश दिल्यास आणखीन सामर्थ्यशाली देश होणार आहे तसेच लोकहिताचे निर्णय घेण्यासाठी नरेंद्र मोदीच पंतप्रधान व्हावेत यासाठी महायुतीकडून घोषित केलेल्या आबकी बार चारसो पार हा आकडा गाठण्यासाठी हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे अधिकृत उमेदवार खासदार धैर्यशील माने यांना पुन्हा एकदा मतदान करून देशाच्या सर्वोच्च सभागृहात पाठवावे असे आवाहन भारतीय जनता युवा मोर्चा कोल्हापूर जिल्हा ग्रामीण पूर्वचे अध्यक्ष व शिरोळचे माजी नगरसेवक डॉ अरविंद माने यांनी केले आहे

शिवनाकवाडी (ता शिरोळ) येथे महायुतीचे उमेदवार खासदार धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ प्रचार फेरी काढण्यात आली. यावेळी माजी नगरसेवक डॉ अरविंद माने हे बोलत होते ते पुढे म्हणाले की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हातामध्ये आपला देश सुरक्षित आहे शेतकऱ्यांना पंतप्रधान किसान सन्मान योजना महिलांना उज्वला गॅस कनेक्शन तसेच मोफत धान्य पुरवठा महिला बचत गटांना अर्थसहाय्य मोफत आरोग्य सुविधा तरुणांसाठी उद्योगधंद्यांची निर्मिती कलम ३०७ कायदा रद्द मुस्लिम महिलांसाठी अन्यायकारिक असणारा तलाक कायदा रद्द अशा अनेक जनकल्याणकारी योजनेच्या माध्यमातून सर्वच जनतेची काळजी घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे यामुळे देशाचे भवितव्य घडवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच तिसऱ्यांदा पंतप्रधान होणे आवश्यक आहे त्याकरिता खासदार धैर्यशील माने यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन डॉ माने यांनी शेवटी केले आहे.

# दक्षिण मुंबईच्या विकासासाठी पुन्हा संसदेत जाणार : अरविंद सावंत



**मुंबई** : दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघ हा वरळी भायखळा, मलबार हिल शिवडी, कुलाबा, गिरगाव या विधानसभा मतदारसंघांचा मिळून तयार झाला आहे. या लोकसभा मतदारसंघांम ध्ये गुजराती, मराठी, अल्पसंख्याक, उच्चभ्रू लोकवस्ती आहे. त्यामुळं या मतदारसंघात जनता आपल्याला निवडून देईल, असा विश्वास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लोकसभा उमेदवार अरविंद सावंत यांनी व्यक्त केला आहे.


दक्षिण मुंबईतील समस्या सोडवणार : दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघ अतिशय दाट लोकवस्तीचा मतदार संघ आहे. त्यामुळं या मतदारसंघांमध्ये जुन्या इमारतींच्या विकासाचा प्रश्न, शिवडी येथील बिडीडी चाळ पुनर्विकासाचा प्रश्न, गिरण्यांच्या जमिनीचा प्रश्न, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्याचा प्रश्न, तसंच कामाठीपुरासारख्या विभागातील रखडलेल्या क्लस्टर योजनेचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण केंद्रीय स्तरावर निश्चितपणे प्रयत्न करू अशी, ग्वाही यावेळी बोलताना अरविंद सावंत यांनी दिली.

जुन्या चाळींचा विकास करणार : या परिसरातील अनेक जुन्या चाळींचा विकास करताना काही अडचणी समोर येणार आहेत. यापैकी महत्त्वाचं म्हणजे मालक आणि भाडेकरू यांच्यातील वाद. मालकांना बाजूला ठेवून भाडेकरूंचा कसा विकास करता येईल, असा प्रश्न न्यायालयानं नुकताच उपस्थित केला आहे. मात्र, जर मालकांना विकासामध्ये रसच नसेल तर, भाडे करून मी त्यांच्या विकासाबाबत विचार करायला काहीही अडचण नाही. याबाबतचा एक कायदाच तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केला आहे. त्या कायद्यानुसार येथील भाडे करूनच्या विकासासाठी न्यायालयाचा आदेश मानत प्रयत्न केला जाईल, असंही सावंत यांनी सांगितलं.

बेरोजगारी, उद्योगांचा प्रश्न महत्त्वाचा : बेरोजगारी, उद्योगाचा प्रश्न माझ्यासाठी महत्त्वाचा आहे. मुंबईमधील रोजगार मुंबई बाहेर पळवले जात आहेत, अशा वेळेस मुंबईतील मराठी माणसाला त्याचा रोजगार मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे सावंत यांनी सांगितले. तर हा आपला पारंपरिक मतदार संघ असून या मतदार संघातील अल्पसंख्यांक, दलित सर्वच मतदार आपल्यासोबत आहेत. तसंच खरी शिवसेना कोणाची ही इथल्या मतदाराला चांगले माहित आहे. त्यामुळे आपला विजय निश्चितच होईल, असा दावाही त्यांनी यावेळी केला.

# कामगारांसाठी लढणारे लीडर्स हवेत, भाजपच्या व्यासपीठावर बसलेले 'डीलर नको' - सचिन अहिर

- आकुर्डीत संजोग वाघेरे यांच्या समर्थनार्थ कामगार संघटनांचा संयुक्त मेळावा
- उद्योगनगरीतील कामगारांनी दिला ''मस्तवाल भाजप सरकार हटाव''चा नारा
- महाविकास आघाडीला विजयी करण्याचा कामगारांचा संकल्प



**पिंपरी/प्रतिनिधी :** आपण संघटना म्हणून आलेल्या व्यक्ती कुठल्याही जातीच्या, धर्माचा, पक्षाचा आहेत. हे विचार करत नाही. पण, यावेळीची ही निवडणूक आपल्या सर्वांच्या जिवनाशी संबंधित निवडणूक आहे. आज देशाच्या हितासाठी आणि कामगारांच्या संघटित आणि असंघटित शक्तीसाठी लोकसभेमध्ये कामगारांचे प्रतिनिधी करणारे लोक पाठविण्याची आपली नैतिक जबाबदारी आहे. आपल्यासाठी लढणारे कामगारांचे लीडर्स पाहिजेत, भाजपच्या व्यासपीठावर बसलेले डीलर नको पाहिजेत, असे मत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे संपर्कप्रमुख तथा आमदार सचिनभाऊ अहिर यांनी व्यक्त केले.

ते आकुर्डी येथील खंडोबा सांस्कृतिक भवन येथे मावळ लोकसभेचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित कामगार मेळाव्यात ते बोलत होते. या वेळी मावळ लोकसभा मतदार संघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील, कामगार संघटना संयुक्त कृती समितीचे महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्ष (इंटक) डॉ. कैलास कदम, शिवसेना शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले, सीआयटीयूचे पुणे जिल्हा अध्यक्ष कॉ. अजित अभ्यंकर, अखिल भारतीय कामगार सेनेचे डॉ. रघुनाथराव कुचिक, मेघाताई थत्ते, किरण मोघे, श्रमिक एकता महासंघाचे दिलीप पवार, राष्ट्रीय श्रमिक एकता महासंघाचे किशोर ढोकळे, आयटकचे कॉ. अनिल रोहम, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे गणेश दराडे, सीटूचे वसंत पवार, कष्टकरी संघर्ष महासंघाचे काशिनाथ नखाते, टाटा मोटर्स युनियनचे शिशुपाल ठोमर, इंटकचे मनोहर गाडेकर, संरक्षण कामगार संघटनेचे सुनील भालेकर, बँक कर्मचारी संघाचे सुनील देसाई, टाटा मोटर्स युनियनचे सतीश काकडे, पीएमपीएलचे राजेंद्र खराडे यांच्यासह कामगार संघटना संयुक्त कृती समितीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कामगार वर्ग मोठ्या संखेने उपस्थित होते.

आमदार सचिन अहिर पुढे म्हणाले, देशाच्या पंतप्रधान गजनी झालेले आहेत. २०१९ ला काय बोलले, २०१४ ला काय बोलले, २०२४ मध्ये बोलत नाही. त्यांनीच सांगितलं शेतकरी, कष्टकरी आणि कामगारांच्या जीवनामध्ये अच्छे दिन येतील आणि आता जर अशी अवस्था आहे. मात्र, कामगारांच्या प्रश्नाच्या बाबतीत चर्चा होत नाही. शेतकरी, तरुण, महिला आणि बेरोजगारी यांना काय देणार त्याची चर्चा होत नाही. सध्या देशाचे पंतप्रधान इकडे येतात 'असली नकलीचा वाद' करतात आणि भुताटकी लागल्याप्रमाणे आत्मा शोधण्याचे काम चालू आहे. देशातल्या स्तरावरच्या प्रश्नांवर आणि विषयाबाबत चर्चा करत नाहीत. त्यांच्या पायाखालची वाळू घसरत चाललेली आहे. ज्यावेळी सर्व मुद्दे संपतात कुठच्याही मुद्द्याला साथ मिळत नाही. मग जाती जाती आणि धर्माधर्मामध्ये तिढा निर्माण करून आपल्यामध्ये मतभेद निर्माण करून परत एकदा सत्तेवरती बसण्याचा तो त्यांचा केविलवाणा प्रयत्न आहे.

जाहीरनामांमध्ये अग्निविरची योजना रद्द करू कायमस्वरूपी काम देणारी योजना आणण्याचं काम करू. सरकारी कर्मचाऱ्यांची आतापर्यंत सव्वा लाख पद भरले गेले नाहीये म्हणून पहिला काम सरकार मध्ये आल्यानंतर लाभ दोन लाख दरवर्षी एक सरकारी कर्मचाऱ्यांची जे कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने काम चाललेले ते रद्द करून त्या लोकांना देखील रोजगार देण्याचे काम करू हे जाहीरनामांमध्ये आहे. सुसक्षित बेरोजगारांना भत्ता देण्याचे काम केले जाईल. जेणेकरून त्याची घर आणि कुटुंब चालवण्याची त्यांची परिस्थिती होईल, अशी देखील या जाहीरनाम्यामध्ये काम केलेलं आहे. उद्धव ठाकरे साहेबांनी स्पष्ट केलेले आहे की, सर्वांत प्रथम बाहेर गेलेले महाराष्ट्रातील उद्योग परत आणण्याचे आहेत. आपल्यातला एक कामगार संजोग वाघेरे पाटील उद्या जर लोकसभेमध्ये गेले तर हक्काने त्यांच्याकडून आपले प्रश्न सोडून घेऊ शकतो. वातावरण बदलत आहे. ज्यावेळी इतिहास लिहला जाईल. या देशात आणि या राज्याचा त्यावेळी एका बाजूला निधी होता. दुसऱ्या बाजूला निष्ठा होती. एका बाजूला हुकुमशाही होती, दुसऱ्या बाजूला लोकशाही होती. हुकूमशाही सोडून लोकशाहीबरोबर आम्ही राहिलो. त्यासाठी संजोग वाघेरे पाटलांना पाठिंबा देवून त्यांना लोकसभेत पाठवा, असं आवाहन त्यांनी केले.

या मेळाव्यात पिंपरी चिंचवड, पुणे जिल्हा, मावळ लोकसभा मतदारसंघातील, तसेच राज्य व देश पातळीवर कार्यरत सुमारे पन्नासहून अधिक कामगार संघटनांनी संजोग वाघेरे पाटील यांना पाठिंबा जाहीर केला. तसेच, संघटनांच्या प्रतिनिधींनी मोदी सरकारच्या धोरणांवर सडकून टीका करत त्यांना व त्यांना मदत करणा-यांना पुन्हा निवडून न देण्याचा निर्णय घेतला.

**■ अन्यायकारक कायदे रद्द करण्यासाठी कामगारांचा आवाज बनणार : संजोग वाघेरे**

उमेदवार संजोग वाघेरे पाटील बोलताना म्हणाले की, ही निवडणूक आपल्या अस्मितेची आहे. देशाची प्रगती झाली का, कामगारांची प्रगती झाली का ? आपल्या शेतकऱ्यांची प्रगती झाली का ? देशामध्ये नवीन उद्योगधंदे आलेत का ? जे आहेत ते उद्योगधंदे टिकलेत का ? कामगार काय करू शकतो, हे यापूर्वी आपण देशाला, राज्याला आणि भांडवलदारांना दाखवले आहे. कामगारांची ताकद फार मोठी आहे. कामगार क्रांती आणू शकतो आणि तीच क्रांतीची मशाल आपल्याला आता लोकसभेमध्ये पाठवण्याचे काम कामगारांनी केले पाहिजे. सरकारने जे कायदे बदललेले आहेत ते कायदे रद्द केल्याशिवाय मी शांत बसणार नाही. मी तुम्हाला शब्द देतो आणि खात्री देतो जोपर्यंत हे कायदे रद्द होत नाही. तोपर्यंत कामगार म्हणून मी त्या ठिकाणी लढा देत राहणार. अनेक वर्ष कामगारांच्या व्यथा कामगारांचे जे प्रश्न आणि नीमचे प्रश्न आहेत. त्यासाठी बाजू मांडण्याचे काम करणार आहे. मी सुद्धा कामगार असल्यामुळे कामगारांच्या व्यथा मी जाणतो. कामगारांना त्यांच्या हक्काची पेन्शन मिळाली पाहिजे. आशा सेविकेंचा पगार दुप्पट करण्यासठी प्रयत्न करणार आहे. तसेच फोर्स मोटर्स कामगारांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपल्या खांद्याला खांदा लावून काम करेल याची खात्री देतो. कामगारांच्या प्रती जी क्रांतीची मशाल आहे. ही मशाल आपल्या कामगारांचे प्रतीक आहे. कामगारांचा प्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी द्या, अशी साद उपस्थित कामगार वर्गाला घातली.

**■ कामगारांच्या हितावरच मोदी सरकारने घाला घातला : डॉ. कैलास कदम**

डॉ. कैलास कदम म्हणाले की, ४४ कामगार कायदे ज्या चुकीच्या पद्धतीने त्याच्यावरती घाला घालण्यात आला. कायम कामगार हा शब्दच कायमचाच नष्ट होणार आहे. आपल्याला संप करण्याचा अधिकार सुधा काढून घेण्यात आलेला आहे. त्यांनी भीषण कोड मध्ये बदल केलेत. आपल्या सर्वांना एकत्र येऊन या देशांमध्ये, केंद्रामध्ये स्थापन झालेले मोदी आणि शहाचं सरकार हे भाजपचे सरकार आणि राज्यांमध्ये स्थापन झालेले हे त्रिसूत्री सरकार आपल्याला खाली खेचायचे आहे. आज लढाई आहे ती धनशक्ती विरुद्ध जनशक्ती. एका बाजूला करदात्याची लुट करून धनशक्ती कमवलेली आहे. आणि एका बाजूला जनशक्ती आहे. जनसमुदायामध्ये शेतकरी, कामगार आणि सर्व जाती धर्माचा घटक हा एकत्र आलेला आहे. इंटकच्या माध्यमातून आम्ही राज्यभर फिरून कामगारांना आश्वासित करत आहोत. केंद्रातील भाजप सरकारने कामगार क्षेत्रावर घाव घातला आहे त्या सरकारला उलथवून टाकायचे असेल तर या लोकसभेच्या निवडणुकीत मतदानाच्या मशाल चिन्हावर बटन दाबून व्यक्त करायचे आहे. महाविकास आघाडीच्या आणि इंडिया आघाडी राहुलजी गांधी यांचे हात मजबूत करण्यासाठी प्रत्येक उमेदवाराला आपल्याला निवडून द्यायचे आहे. बेरोजगारी, महागाई वाढलेली आहे जो कामगारांमध्ये जो असंतोष आहे तो मतपेठीतून दाखवून देयाचा आहे. मावळ लोकसभेचे महाविकास घडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना लोकसभेमध्ये पाठविण्यासाठी मशाल चिन्हावर शिक्कमोर्तब करा, असे आवाहन डॉ. कदम यांनी केले.

# निवडणुकीत उदयनराजे विरोधकांची 'पिपाणी' करणार - फडणवीस



**सातारा :** कोल्हापुरात शाहू महाराजांना बिनविरोध करण्याची भाषा वापरणाऱ्या नेत्याने साताऱ्यात दुटप्पीपणा दाखवला आहे. या नेत्याने शौचालयात पैसे खाणाऱ्या उमेदवाराला उदयनराजेंच्या विरोधात सातारा लोकसभेची उमेदवारी दिली आहे, या नेत्याची पिपाणी केल्याशिवाय खासदार उदयनराजे थांबणार नाहीत, असा असा घणाघात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

महायुतीचे लोकसभा उमेदवार खासदार उदयनराजे भोसले यांच्या प्रचारार्थ येथील तालीम संघावर आयोजित केलेल्या विराट सभेत ते बोलत होते. याप्रसंगी ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री शंभूराज देसाई, माजी मंत्री महादेव जानकर, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार महेश शिंदे, खासदार अमर साबळे, आमदार देवयानी फरांदे, माजी आमदार मदन भोसले, भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, राष्ट्रवादीचे जिल्हा कार्याध्यक्ष अमित कदम, रिपाईचे जिल्हाध्यक्ष अशोक गायकवाड, ज्येष्ठ नेते अण्णा वायदंडे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख चंद्रकांत जाधव, पुरुषोत्तम जाधव, मनसेचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील, वसंतराव मानकुमरे, प्रतापगड कारखान्याचे चेअरमन सौरभ शिंदे, भाजपच्या महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्ष चित्रलेखा माने कदम, जिल्हाध्यक्ष सुरभी भोसले, प्रदेश सदस्य सुवर्णाताई पाटील, माजी नगराध्यक्ष माधवी कदम यशराज पाटील, एडव्होकेट बाळासाहेब बाबर, अविनाश कदम, अशोक मोरे, बाळासाहेब गोसावी, रामकृष्ण वेताळ आदींची प्रमुख उपस्थिती होती.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, साताऱ्याची ही विराट संकल्प सभा पाहून चार जूनच्या निकाला दिवशी गुलाल उधळायला साताऱ्यात यावच लागेल, हे आता स्पष्ट दिसते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाची वाटचाल अत्यंत गतीने सुरू आहे. देश त्यांच्या हातामध्ये सुरक्षित आहे, याची जाणीव संपूर्ण देशातील जनतेला झालेली आहे. सत्ता होती, तेव्हा जनतेला वाऱ्यावर सोडलेल्या नेत्याने मोदींना ऊसातलं काय कळतं अशी टिंगल केली होती. त्याच मोदींनी शेतकऱ्यांच्या मालकीच्या साखर कारखान्यावर असलेला इन्कम टॅक्स रद्द करून शेतकऱ्यांची सुटका केली. मोदींना समजलं ते तुम्हाला समजलं नाही. जनतेच्या मनातील स्पंदन, रुदन हे मोदींना थेट समजते,असे ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले, कोल्हापूरच्या शाहू महाराजांच्या विरोधात महायुतीने उमेदवार द्यायला नको होता असे ते म्हणतात मात्र साताऱ्याच्या बाबतीत त्या उलट भूमिका घेतात यातून त्यांचा दुटप्पीपणा समोर आला आहे. उमेदवार दिला तोही घोटाळेबाज आहे. त्यामुळे साताऱ्याची जनताच उदयनराजेंना रेकॉर्ड ब्रेक मते देऊन छत्रपतींच्या भूमीचा हुंकार हा देशाचा हुंकार आहे, हे दाखवून देईल.

उदयनराजे म्हणाले, देशाला तांत्रिक दृष्ट्या मागास ठेवण्याचे पाप काँग्रेसने केले आहे. महायुतीच्या काळामध्ये सातारा जिल्ह्यात तब्बल दहा हजार कोटींची कामे झाली. आता टुरिझम, आयटी पार्क ,कृष्णा नदीचे शुद्धीकरण, एमआयडीसीची निर्मिती, स्ट्रॉबेरी, हळद ,बटाटा संशोधन केंद्र ,अग्रो प्रोसेसिंग युनिट्स उभारण्याच्या अनुषंगाने आम्ही पाऊले टाकत आहोत. आम्हाला केंद्र व राज्य सरकारचे निश्चितपणाने बळ मिळणार आहे. ५५ वर्षांमध्ये जे काँग्रेसला जमले नाही ते आम्ही दहा वर्षात करून दाखवले आणि इथून पुढच्या काळात देखील प्रगतीची ही गंगा अशीच वाहत राहणार आहे,असे उदयनराजे म्हणाले.

आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणाले, महाविकास आघाडीचे नेते प्रचारामध्ये मतदारांच्या पायात साप सोडण्याचे काम करत आहेत. कुणी कितीही सांगितले तरी आम्ही खासदार उदयनराजे भोसले यांच्या सोबत काम करत आहोत. महायुतीचे चारही आमदार त्यांना मोठ्या मताधिक्याने विजय करू.

# सत्तेचा गैरवापर करून हुकूमशाही करणाऱ्या गद्दारांना हटवा - माजी केंद्रीय मंत्री शरद पवार



**भोर/प्रतिनिधी**

सध्याचे देशातील व राज्यातील सरकार सर्वसामान्य जनतेसाठी नसुन हुकूमशाहीचे आहे. दोन्ही सरकारकडून सत्तेचा गैरवापर सुरू आहे. त्या गोष्टी जनता सहन करणार नाही. सत्तेचा गैरवापर करून हुकूमशाही करणाऱ्या गद्दारांना हटवा.व बारामती लोकसभेतून सुप्रिया सुळे यांना विजयी करण्याचे आवाहन प्रचाराच्या सांगता सभेत माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनी उपस्थितांना केले.

भोर येथील राजा रघुनाथराव विद्यालयाच्या प्रांगणात महाविकास आघाडीच्या उमेदवार खासदार सुप्रिया सुळे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत रविवार ( दि.५ ) रोजी माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार बोलत होते.

पवार पुढे म्हणाले भोर, राजगड (वेल्हे), मुळशीतील जनतेचा सुप्रिया सुळे यांना पूर्ण पाठिंबा असून यंदाच्या लोकसभेच्या निवडणुकीत मावळे इतिहास रचतील.यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मंत्री अनिल देशमुख, सुनील केदार डॉ.अमोल कोल्हे,आमदार वजाहद मिर्जा,आमदार संग्राम थोपटे, अशोक मोहोळ,नाना नवले, जगन्नाथ शेवाळे, तालुकाध्यक्ष शैलेश सोनवणे,रवींद्र बांदल, पृथ्वीराज थोपटे, लहूनाना शेलार, विठ्ठल आवाळे, विठ्ठल शिंदे, अनिल सावले, सतीश चव्हाण गणेश खुटवड,माउली शिंदे आदींसह हजारोंच्या संख्येत नागरिक उपस्थित होते.

यावेळी बोलताना नाना पटोले म्हणाले पंजा व तुतारीची जोडी मजबूत करून मोदी सरकारला धडा शिकवा देशाला कर्जबाजारी करणाऱ्यांना घरी घालवा.तर माजी मंत्री सुनील केदार म्हणाले छत्रपती शिवाजी महाराज यांची विचारधारा जोपासून स्वाभिमानाने जगा,मराठी बाण्याचा अपमान सहन करून घेवू नका. तसेच मावळ्यांनो देशातील सर्वसामान्यांची निवडणूक असल्याने केंद्रातील सरकार खाली खेचून परिवर्तनाचे शिलेदार व्हा असे डॉ.अमोल कोल्हे यांनी सांगितले.

पान १ वरून

## आमदार रोहित पवार यांना अश्रू अनावर

गेल्या अनेक दिवसांपासून आक्रमकपणे वक्तव्य करणारे रोहित पवार या सभेमध्ये मात्र अचानक भावनिक झाले.

यावेळी आमदार रोहित पवार म्हणाले, जेव्हा पक्ष फुटला तेव्हा मी आणि काही पदाधिकारी साहेबांसोबत बसलो होतो. पवार साहेबांशी आम्ही चर्चा करत होतो. ते टीव्हीकडे बघत होते. त्यांनी चेहऱ्यावर दाखवलं नाही. त्यांना आम्ही काही प्रश्न विचारले त्यांनी उत्तरं दिली. बाहेर जाताना त्यांनी आम्हाला सांगितलं की, तुम्ही अजिबात काळजी करू नका, हा आपला स्वाभिमानी महाराष्ट्र आपल्याला घडवायचा आहे. तो घडवण्यासाठी आपल्याला नवीन पिढीला ताकद द्यायची आहे. जोपर्यंत नवी पिढी जबाबदारी घेण्याच्या पातळीची होत नाही, तोपर्यंत मी माझे डोळे मिटणार नाही, असे पवार साहेबांचे शब्द होते.असे म्हणताच रोहित पवारांना स्टेजवर अश्रू अनावर झाले. डोळ्यात पाणी आलेले असताना रोहित पवार समोर बसलेल्या शरद पवारांना उद्देशून म्हणाले की, साहेब तुम्हाला विनंती करतो की हे वक्तव्य तुम्ही केलं ते कृपा करून पुन्हा करू नका. तुम्ही आमचा जीव, आत्मा आहात. जे लोकं तुम्हाला त्रास देतात, ते मोठे नेते काहीही बोलले तरी सामान्य जनता आणि पवार कुटुंब तुमच्याबरोबर आहे, असेही रोहित पवार यावेळी म्हणाले.

## आपण सगळे एक आहोत, तोपर्यंत बारामतीकरांना कोणी धक्का लावणार नाही

मी कांद्याचा प्रश्न संसदेत मांडला म्हणून माझे निलंबन झाले. पण हा प्रश्न मांडणे गुन्हा असेल तर तो मला मान्य आहे. सामाजिक परिवर्तन ही पवार साहेबांची दूरदृष्टी होती. या कामांसाठी त्यांनी दिशा दिली. बारामतीच्या ताकदीचा केंद्रबिंदू शरद पवार आहे. तुमचा आवाज बनून उभा राहणारा खासदार तिथं पाठवावा. संसदेत मी उभा राहणारा आहे त्यामुळे मतं मी मागणार आहे, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

आमदार रोहित पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केली. राज्याच्या सत्तेची चावी अजितदादांकडे असूनही चेकवर कोणतीही सही करताना त्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची संमती घ्यावी लागते, हे दुर्दैव आहे.

खासदार अमोल कोल्हे यांनी शरद पवार हे वटवृक्ष असून या वटवृक्षाच्या दोन पारंब्या बाजूला झाल्या म्हणून त्या वटवृक्षाला काही फरक पडत नसल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. सुप्रिया सुळे यांचा विजय आजच्या गर्दीवरून स्पष्ट होत असल्याचे बोलले यांनी सांगितले.

## वणव्याच्या आगीत घर जळून खाक

तालुका महाबळेश्वर वय ४०) हे या घरात अडकून पडल्याचे लक्षात आले.

धावाधाव सुरू झाली या घटनेची माहिती मिळताच ऐस ओ ऐस ग्रुप च्या सदस्यांना मिळताच त्यांनी अँब्युलन्स आणि नगरपालिका बंबाला पाचारण केले. सदस्यांनी माने यांना कुलूप तोडून आगीतून बाहेर काढले. जखमी अवस्थेतील माने यांना उपचारासाठी पांचगणी येथील शासकीय आरोग्य केंद्रात दाखल केले परंतु तो गंभीर जखमी झाल्याने त्याला सातारा येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे.

ही आग इतकी भडकली होती की सायंकाळपर्यंत आग चालू होती नगरपालिकेच्या बंबाने ही आग विझविण्याचा प्रयत्न सुरू होता तर त्यांना एम् आर ए च्या कर्मचाऱ्यांनी मदत केली परंतु या आगीवर नियंत्रण मिळवता आले नाही. या दुर्घटनेत घर आगीत भस्मसात झाले असून यामधील घरातील सर्व साहित्य जळून खाक झाले. त्यामुळे माने यांचे मोठे नुकसान झाले आहे.

**■ घरातील मुले बचावली...**

आग लागलेल्या घरात अनिल माने आणि त्यांची दोन मुले राहतात. अनिल ड्रायव्हरचे काम करतो. काम संपवून सकाळी तो घरी आल्याने त्यांची दोन्ही मुले घराला कुलूप लावून शाळेत गेली होती. त्यामुळे ही मुले बाल बाल बचावली. दैव बलवत्तर म्हणून ती सुखरूप आहेत.

**■ आग विझवताना आगी महू उठल्याने अडथळा......**

आग लागलेले घर हे जंगल भागात असून आग लागल्यानंतर आग आणि धुराने शेजारीच एका झाडावर असणारे आगी महू उठले आणि त्यामुळे आग विझवण्यासाठी आलेल्या सर्वांना ते चाऊ लागले. त्यामुळे आग विझवतांना या मध माशांचा मोठा अडथळा निर्माण झाला होता.

## अवैध गुटखा वाहतूक करणाऱ्यांवर मेढा पोलिसांची कारवाई

एक पांढरे रंगाची महिद्रा कंपनीची बलेरो गाडी येत असलेली दिसली. सदर वाहनास थांबवून त्याची पाहणी केली असता त्यामध्ये गुटखा, पान मसाला असलेबाबत आढळून आले. पोलीस कर्मचारी व पंचांचेसमक्ष जावुन खात्री करून सदर वाहनांमध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला व मानवी आरोग्यास अपायकारक असणारे अवैद्य गुटखा मिळून आल्याने सदर वाहनांवरील इसम अशोक रामचंद्र धनावडे वय ५१ वर्षे,ऋतीक आनंदा सपकाळ वय २१ वर्ष, विद्याधर सखाराम धनावडे वय १७ वर्ष सर्व रा.मोहाट ता.जावली जि.सातारा यांना ताब्यात घेण्यात आले आहे.तर हा गुटखा अतुल बाजीराव धनावडे रा.मोहाट ता.जावली जि.सातारा याचा असल्याचे सांगीतले व त्याचेच सांगणेवरून सदरचा माल विक्री करणेकरीता घेऊन आलेलो आहे, असे सांगितलेने त्यांचे कब्जात मिळुन आलेला गुटखा पान मसाला व एक पांढरे रंगाची महींद्रा कंपनीची बलेरो मॅक्सीट्रक प्लस पिकअप एम.एच.११ डी.डी. ९८२ असा एकुण ५७८ .७१२/- रूपयांचा मुद्देमाल ताब्यात घेवुन जप्त करणेत आलेला आहे.

सदर कारवाईत मेढा पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी संतोष तासगांवकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक,सहा.पो. फौ.गंगावणे, पो. हवा.डी.जी. शिंदे, पो.हवा.जायगुडे, पो. कॉ.काळे,घोरपडे,मोरे अभिजित वाघमळे यांनी सहभाग नोंदवला.

## पिण्यास पाणी मिळत नाही आणि 'स्मार्ट सिटी' करायला निघालेत : ॲड. बाळासाहेब आंबेडकर

आहे, नागरीकांनी देशहितासाठी वंचितांच्या उमेदवारांनाच पसंती दिली पाहिजे असे मत बाळासाहेब आंबेडकर यांनी हडपसर मधील जाहीर सभेत बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर वंचितचे शिरुर लोकसभा उमेदवार डॉ. अन्वर शेख, राज्य युवा कार्यकारणी ऋषिकेश नांगरे पाटील, राज्यकार्यकारणी सदस्य विशाल गवळी,अफरोज मुल्ला ,पुणे जिल्हाध्यक्ष राजकुमार,कमलेश उकरंडे,पुणे शहर युवा अध्यक्ष सोमनाथ पानगावे,पुणे शहर महासचिव शुभम चव्हाण,पोर्णिमा ओव्हाळ,हडपसर विधानसभा अध्यक्ष लखन कांबळे,विश्वास गदादे,चैतन्य इंगळे,जानवी शेलार,ॲड अरविंद तायडे,विशाल कसबे,प्रियंका लोंढे,शारदा बनसोडे,मौलाना हुसेन शेख, पीतांबर धिवार उपस्थित होते.

उमेदवार डॉ. अन्वर शेख म्हणाले की,एक चांगला पर्याय म्हणून मला वंचित बहुजन आघाडीची तत्वे आवडली ,या निवडणुकीत पक्षाची ताकत दिसून येईल. तरूणांची संख्या देशात मोठी आहे. त्यांचे शिक्षण, कौशल्यविकास व रोजगार महत्वाचे आहेत. महिला, शेतकरी, कामगार यांचे देशाच्या विकासात महत्वपूर्ण भूमिका असूनही त्यांच्याकडे कोणत्याही सरकारने लक्ष दिले नाही.

## एवढे वर्ष त्यांना संधी दिली, आता आम्हाला द्या!

प्रश्न सांगितले असते, भेटायला आले असते, एकत्र बसून चर्चा केली असती, तर जसा बारामतीचा विकास केला तसा इथलाही झाला असता मात्र स्थानिक आमदार, खासदारांनी विकासासाठी माझी कधी भेट घेतली नाही, ना इथले प्रश्न मला सांगीतले.त्यामुळे येथील विकास कामांना खीळ बसली.यांच्यामुळे भोरला मुबलक पाणी, लाईट, रस्ते, उत्रौली येथील जागेवर शेरे पडले असताना देखिल औद्योगीक वसाहत झाली नाही नोकरीअभावी स्थलांतर झाल्याने लोकसंख्या घटली व त्यांनीच माझ्यावर आरोप करायाचे तेंव्हा हे पालकमंत्री होते यांनी काय केले ? त्यावेळी काँग्रेस पक्षाचे मुख्यमंत्री, उद्योगमंत्री होते ह्यांनी त्यांच्याकडून कामे करुण का घेतली नाही?.त्यासाठी ह्यांना कोणी आडवले होते ? असा टोला आमदार व खासदार यांचे नाव न घेता अजित पवार यांनी संग्राम थोपटे व सुप्रिया सुळे यांना दिला.

पुढे अजित पवार म्हणाले की येत्या काळात मुख्यमंत्री, उद्योगमंत्री अधिकारी यांना घेऊन मीटिंग लावून चर्चा करून स्थानिक शेतकऱ्यांना जमिनीचा योग्य भाव देऊन उत्रौली येथील औद्योगीक वसाहती चा प्रश्न मार्गी लावणार आहे. तसेच माळीन धर्तीवर कोंढरी , धानवली च्या पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लाव णार आहे. पर्यटनाला चालना देण्यासाठी निधी प्राप्त करून देणार आहे. आता त्यासाठी मला स्थानिक आमदार खासदारांना विचारायची गरज नाही. आत्ता पर्यंत इतरांचे ऐकले आता माझे ऐका, विश्वास ठेवा, मी जे बोलतो ते मी करतोच.

## करण सेनेच्या प्रसंगावधाने बाका प्रसंग टळला

त्यांनी घटनेचे गांभीर्य ओळखत या सेनेने लोकसभा निवडणूक प्रचार सोडून घटना स्थळी धाव घेतली व आग विझवणेचे कार्य हाती घेतले दरम्यान अग्निशामक साठी नगरपालिकेशी संपर्क केला तथापि सदर अग्निशामक प्रचार सभेसाठी येणारे झेड सुरक्षा धारकांचे सुरक्षेसाठी परगावी गेला होता मग मागचा पुढचा विचार न करता स्वता:चे वाहनातून टाक्या ठेऊन पाणी आणुन आग आटोक्यात आणली विशेष म्हणजे पुढे थोडया अंतरावर गॅस गोडाऊन होते यामुळे परिसरात करण पोरे यांच्या प्रसंगावधानाचे कौतुक होत आहे. यावेळी त्यांच्यासोबत ऍड शुभम पोरे, सागर नामदे, दादा खासबागे, विशाल गोंजारी, विशाल लोखंडे, अदिनाथ पिसे प्रशांत चव्हाण आदी सवंगड्यांनी परिश्रम घेतले व पुढील अनर्थ टाळनेचा प्रयत्न केला.

## भाजप संविधान बदलणार, हा प्रचार खोटा - नितीन गडकरी

आहे. ही निवडणूकीत अंतीम टप्प्यात आहे पवार साहेबाचा हा मतदारसंघ आहे. त्यांनी नेतृत्व केले. जिल्हा त्यांच्या विचाराने चालायचा जिल्हा कायम त्यांचायसोबत होता. २००९ ला खासदार झाल्यावर त्यांच्याकडून मोठ्या अपेक्षा होत्या पाणीप्रश्न सुटेल पिढ्यान पिढ्याचा दुष्काळांचा कलंक संपेल या अपेक्षा होत्या जनता त्यांच्या पाठीमागे उभा राहली. ते खासदार झाले आम्हाला वाटले बारामती होईल विकास होईल पाणीप्रश्न सर्व काम विसरून गेले.पुन्हा उमेदवार म्हणून फिरायला लागले पण त्यांच्याविरोधात नाराजीची लाट निर्माण झाली व माढा अन पवारांना पाडा अशी लाट तयार झाल्याने माघार घ्यावी लागली अन निंबाळकर निवडून गेले त्याच वेदना अजून आहेत त्यामुळेच त्यांनी माढ्यावर लक्ष दिलेय. देशाची निवडणूक आहे नेतृत्व कोण करतय पाणी योजनेला मोदींजींनी निधी दिलाय रस्त्याचे चा जाळे तयार केले.

आ. महादेवराव जानकर म्हणाले, मी परभणीत जिंकतोय. भाग दुष्काळी असला तरी लोक आत्महत्या करत नाहीत जिद्दीने लढतो सिंचनाच प्रश्न सोडवण्यासाठी केंद्रात व राज्यात सत्ता आपलीच आली पाहिजे.

यावेळी माजी खा. विकास महात्मे, सदाभाऊ खोत यांनी मनोगते व्यक्त केली.

## मतदानाआधी दिल्ली काँग्रेसला झटका

### माजी प्रदेश अध्यक्ष अरविंदर सिंह लवली भाजपमध्ये

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीदरम्यान दिल्लीमध्ये काँग्रेसला मोठा झटका बसला आहे. दिल्ली प्रदेश काँग्रेसचे माजी अध्यक्ष अरविंदर सिंह लवली, शीला सरकारमधील माजी मंत्री राजकुमार चौहान, माजी एमएलए नसीब सिंह, माजी एमएलए नीरज बसोया यांनी भाजपचा हात धरला आहे.

अरविंदर सिंह लवली यांनी नुकताच दिल्ली प्रदेश काँग्रेस अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. लवली हे काँग्रेसकडून आम आदमी पक्षाच्या गठबंधनविरोधात होते. ते आधी भआजपमध्ये होते. २०१७मध्ये दिल्ली नगरपालिका निवडणुकीआधी ते भाजपमध्ये सामील झाले होते. मात्र काही महिन्यांतच ते काँग्रेसमध्ये परतले होते.

२०१७मध्ये लवली यांनी काँग्रेसचा हात सोडत भाजपमध्ये सामील झाले होते. त्यानंतर २०१८मध्ये त्यांनी भाजप सोडली आणि पुन्हा काँग्रेसमध्ये सामील झाले.

## अफगाणिस्तानच्या वाणिज्यदूत जाकिया वार्दक यांचा राजीनामा

**मुंबई :** अफगाणिस्तानच्या भारतातील वाणिज्यदूत जाकिया वार्दक यांनी राजीनामा दिला आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे दुबईहून मुंबई मध्ये येताना २५ किलो सोन्याची तस्करी केल्याच्या आरोपामध्ये सोने तस्करीचा गुन्हा नोंदवण्यात आल्यानंतर त्यांनी राजीनामा दिलाय. गेल्या वर्षभरात माझ्याविरोधात अनेक व्यक्तिगत आरोप करण्यात आले व माझी प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करण्यात आला, त्यामुळं कंटाळून राजीनामा देत आहे, अशी माहिती त्यांनी सोशल मीडियावरील पोस्टमध्ये दिलीय.

एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात मुंबई विमानतळावर त्यांना डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी रोखले व त्यांची तपासणी केली. त्यामध्ये त्यांच्याकडे कपड्यांमध्ये २५ किलो सोने लपवल्याचे दिसून आले. त्या सोन्याबाबत जाकिया समाधानकारक उत्तरे देऊ शकल्या नाहीत. त्यामुळे ते सोने पंचनामा करुन जप्त करण्यात आले. अशा प्रकरणामध्ये तस्करी होत असलेल्या सोन्याची किंमत एक कोटीपेक्षा जास्त असल्यास संशयिताला अटक करुन त्याच्याविरोधात कायदेशीर कारवाई केली जाते. या प्रकरणात जप्त करण्यात आलेल्या सोन्याची किंमत सुमारे १८ कोटी रुपये असल्याने अशा प्रकरणांमध्ये तत्काळ आरोपीला अटक करण्याची तरतूद आहे. मात्र जाकिया या वाणिज्यदूत असल्याने त्यांच्याकडे डिप्लोमॅटिक पासपोर्ट आहे. त्यामुळे त्यांना अटकेपासून व कायदेशीर कारवाईपासून संरक्षण आहे.

# पाच वर्षात सर्व भ्रष्टाचाऱ्यांवर कडक कारवाई होणार

## झारखंडमधील सभेत पंतप्रधान मोदी यांची ग्वाही



**पलामू :** जिथे सरकारे भ्रष्ट असतात तिथे निधीची कितीही तरतूद केली तरी विकास शक्य नाही, म्हणूनच आम्ही भ्रष्टाचार हटविण्याचा संकल्प करतो, तेव्हा इंडी आघाडीचे लोक भ्रष्टाचाऱ्यांना वाचविण्यासाठी मोर्चे काढतात. येत्या पाच वर्षात अशा सर्व भ्रष्ट लोकांवर वेगाने कडक कारवाई केली जाईल, आणि भ्रष्टाचार खणून काढला जाईल अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी झारखंडमधील पलामू आणि लोहरदगा येथे आयोजित केलेल्या विशाल जाहीर विजय संकल्प सभांमध्ये बोलताना दिली.

झारखंड भाजपाचे प्रदेशाध्यक्ष श्री. बाबूलाल मरांडी, झारखंडचे विरोधी पक्षनेते व ज्येष्ठ नेते अमर कुमार बाउरी, विद्यमान खासदार व पलामूचे उमेदवार विष्णू दयाल राम, राज्यसभा खासदार सुदर्शन भगत, लोहरदगा उमेदवार व भारतीय जनता पक्षाचे अनुसूचित जमाती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. समीर उरांव, आजसू पक्षाचे अध्यक्ष सुदेश महतो आणि इतर नेते यावेळी मंचावर उपस्थित होते.

आपल्या तडाखेबंद भाषणात पंतप्रधान मोदी यांनी पुन्हा एकदा काँग्रेस आणि इंडी आघाडीवर जोरदार शरसंधान केले. इंडी आघाडीचे नेते जनहित आणि विकासाच्या मागणीसाठी नव्हे तर भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्यासाठी रॅली काढतात, असे सांगून ते म्हणाले की, काँग्रेसने गेल्या ६० वर्षात केवळ घराणेशाही, भ्रष्टाचार आणि तुष्टीकरण केले आहे. काँग्रेसच्या डावपेचांनी देशाला नक्षलवाद आणि माओवादाच्या रक्तरंजित हिंसेचा तडाखा दिला, पण आम्ही सत्तेवर आल्यानंतर देशाचा मोठा भाग माओवाद्यांच्या हिंसेतून मुक्त केला. आपली मते वाचवण्यासाठी काँग्रेस दहशतवाद्यांवर कारवाईही करत नाही, असा आरोपही श्री. मोदी यांनी केला. घुसखोरांना प्रोत्साहन देण्याचा आणि आदिवासींच्या जमिनी बळकावण्याचा घातक खेळ झारखंडमध्ये सुरू आहे. पीएफआयसारख्या बंदी घातलेल्या संघटना संथालमध्ये त्यांचे रॅकेट चालवत आहेत आणि आदिवासी महिलांवर अत्याचार करत आहेत. जेव्हा लोक या विरोधात आवाज उठवतात, तेव्हा इंडी आघाडी व्होट जिहादचे आवाहन करू लागते. काँग्रेसने कितीही जिहाद केले तरी हा देश मागे हटणार नाही, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. झामुमो-काँग्रेसच्या नेत्यांनी भ्रष्टाचाराच्या माध्यमातून अमाप संपत्ती गोळा केली आहे. मालमत्ता असो, राजकारण असो, ते आपल्या मुलांसाठी सर्व काही कमवत असतात. त्यांचा वारसा म्हणून ते बराच काळा पैसा मागे ठेऊन जातील, असा गंभीर आरोप याप्रसंगी बोलताना पंतप्रधानांनी केला.

आज पाकिस्तानचे नेते काँग्रेसच्या राजपुत्राला पंतप्रधान बनवण्याची प्रार्थना करत आहेत, पण सशक्त भारताला आता मजबूत सरकार हवे आहे आणि मजबूत सरकारसाठी मोदी सरकार हवे, ही देशाच्या जनतेची भावना आहे. जनतेच्या आशीर्वादाने मी मुख्यमंत्री आणि पंतप्रधान म्हणून देशवासियांची सेवा करत असून गेल्या २५ वर्षात माझ्यावर एका पैशाच्या घोटाळ्याचाही आरोप झालेला नाही. आजही मी पद, प्रतिष्ठा, सुख-समृद्धी यापासून दूर आहे, आणि हीच माझी ताकद आहे, असेही ते म्हणाले.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, आदिवासी महिलेला राष्ट्रपती बनवण्यास इंडी आघाडीने कडाडून विरोध केला होता. काँग्रेसच्या काळात रेशन सडत राहिले. आदिवासी भागातील मुले उपाशी मरत राहिली आणि काँग्रेसने धान्य गोदामांना टाळे ठोकले. आम्ही सर्व धान्य गोदामांचे कुलूप उघडले, आज देशात मोफत रेशनची योजना सुरू आहे. पुढील पाच वर्षे ही योजना चालू राहील याची मी हमी दिली आहे. झारखंडमध्ये रोज पेपरफुटीच्या घटना घडत असत आणि तरुणांच्या भवितव्याशी खेळले जायचे, पण आज केंद्रातील भाजपा सरकारने पेपरफुटी विरोधात कडक कायदा केला आहे.

देशातील जनतेला कधीही संकटांनी भरलेले जीवन जगावे लागू नये यासाठी मी विकसित भारताचा वारसा देणार आहे, असे पंतप्रधान म्हणाले. मी गरिबीत जगलो आहे आणि गरिबांच्या अडचणीतून गेलो आहे. म्हणूनच माझ्या १० वर्षाच्या गरीब कल्याण योजना माझ्या जीवनातील अनुभवातून जन्माला आल्या आहेत. आज लाभार्थींना भेटल्यावर माझ्या डोळ्यात अश्रू तरळले असून या अश्रूंची किंमत फक्त गरिबीत जगलेली व्यक्तीच समजू शकते. ज्याने आपल्या आईला पोट बांधून झोपताना आणि शौचालया अभावी वेदना आणि अपमान सहन करताना पाहिले नाही, त्याला मोदींच्या या अश्रूंचा अर्थ समजू शकत नाही, असे सांगताना पंतप्रधान काहीसे भावुक झाले. पण काँग्रेसच्या राजपुत्रांना मोदींच्या अश्रूंमध्ये आपला आनंद दिसतोय आणि हे निराश आणि हताश झालेले लोक इतके उदास झाले आहेत की त्यांना मोदींचे अश्रू आवडू लागले आहेत. ''जाके पाँव फटे न फटे बिवाई, सो क्या जाने पीर पराई'' या उक्तीतून काँग्रेसच्या राजपुत्राची अवस्था सांगितली जाते. राहुल गांधी चांदीच्या चमच्याने जेवण करत राहिले, गरिबांच्या झोपडीत फोटो काढत राहिले पण गरिबांसाठी त्यांनी कधी काही केले नाही, असा आरोपही त्यांनी केला. आमच्या १० वर्षाच्या कार्यकाळात २५ कोटी देशवासीय गरिबीतून बाहेर आले आहेत, त्यामुळेच देशातील गरीब जनता मोदींना आशीर्वाद देत असून हे आशीर्वाद मोदींची शक्ती आणि भांडवल आहेत, असेही ते म्हणाले.

मोदींना देशात रोजगार वाढवायचा आहे, लोकांच्या जीवनात समृद्धी आणायची आहे परंतु काँग्रेसचा डोळा सार्वजनिक मालमत्तेवर आहे. काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात सार्वजनिक मालमत्तेचे एक्स-रे काढणे, त्यातील काही भाग जप्त करणे आणि ते आपल्या व्होट बँकांमध्ये वाटण्याची गोष्ट केली आहे. पण हे जनतेला अजिबात मान्य नाही. काँग्रेस आणि इंडी आघाडीने आणखी एक धोकादायक गोष्ट सांगितली आहे. भाजपाचा विजय झाला तर आरक्षण आणि राज्यघटना संपुष्टात येईल, असे खोटे काँग्रेस जनतेमध्ये पसरवत आहे. मात्र, गेल्या १० वर्षापासून देशात भाजपाचे पूर्ण बहुमताचे सरकार आहे आणि भाजपाने आजपर्यंत असे कोणतेही पाऊल उचलले नाही, याकडेही त्यांनी देशाचे लक्ष वेधले. उलट भाजपाने इंडी आघाडी व काँग्रेसचे सत्य उघड केले असून त्यांनाच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांचे आरक्षण हिसकावून घ्यायचे आहे, असा आरोपही श्री. मोदी यांनी केला.

देशात धर्माच्या आधारावर आरक्षण कधीही दिले जाणार नाही, असे संविधानकर्त्यांनी ठरविले होते, पण काँग्रेस-झामुमो आणि राजदसह संपूर्ण इंडी आघाडी आदिवासी, मागासवर्गीय आणि दलितांच्या आरक्षणावर दरोडा घालत असून विशिष्ट वर्गाला धर्माच्या आधारे आरक्षण देण्याचा त्यांचा इरादा आहे, असे ते म्हणाले. काँग्रेसच्या या घोषणेला राजद आणि झामुमोची स्पष्ट संमती असली तरी मोदी जिवंत असेपर्यंत दलित, मागासवर्गीय आणि आदिवासींच्या आरक्षणाला कोणी हात लावू शकणार नाही, संविधानाशी छेडछाड करू शकणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

## इस्त्रायल सरकारनं 'अल-जझीरा' चॅनेलवर आणली बंदी



**राजदंड न्यूज नेटवर्क :** इस्त्रायलमध्ये अल-जझीरा वृत्तवाहिनीवर बंदी घालण्यात आलीय. इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी घोषणा केली की, इस्त्रायलमध्ये अल-जझीराचं प्रक्षेपण होणार नाही.

अल-जझीराने इस्त्रायलच्या या निर्णयाला 'गुन्हेगारी' पाऊल म्हटलंय.

अल-जझीरा चॅनेलच्या व्यवस्थापकांनी इस्त्रायली सरकारचं हे पाऊल धोकादायक असल्याचं म्हणत, अल-जझीरा नेटवर्कची टीम कायदेशीररित्या उत्तर देण्यासाठीची तयारी करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

इस्त्रायल सरकारच्या मंत्रिमंडळाने अल-जझीरा टीव्ही नेटवर्कवर बंदी घालण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. अल-जझीरा चॅनेल इस्त्रायलच्या 'राष्ट्रीय सुरक्षेसाठी धोका' असल्याचं सरकारनं म्हटलंय.

इस्त्रायलच्या निर्बंधांनुसार, इस्त्रायलमधील अल-जझीराची कार्यालये बंद केली जातील, प्रसारण उपकरणे जप्त केली जातील आणि चॅनेल उपग्रह आणि केबल कंपन्यांकडून कापले जातील. याशिवाय, अल जझीरा वाहिनीच्या वेबसाईटवरही देशात बंदी घालण्यात येणार आहे.

इस्त्रायल सरकारने अल-जझीरावर 'इस्त्रायलविरोधी' असल्याचा आरोप आधीही केला आहे.

अल-जझीरा वाहिनीमध्ये कतार सरकारचाही हिस्सा आहे. गाझामध्ये ओलीस असलेल्या इस्त्रायलींच्या सुटकेसाठी सुरू असलेल्या चर्चेत कतार महत्त्वाची भूमिका बजावत आहे. चार इस्त्रायली परराष्ट्रमंत्र्यांचे सल्लागार राहिलेले माजी इस्त्रायली मुत्सद्दी एलॉन पिनकास यांनी बीबीसीशी बोलताना इस्त्रायली सरकारच्या या निर्णयावर टीका केलीय. ते म्हणाले, अल-जझीरावर चुकीच्या वेळी बंदी घालण्यात आलीय. हे निर्बंध अल-जझीराला वृत्तांकन करण्यापासून थांबवू शकत नाहीत.

## मसुरी अपघात : कार दरीत कोसळून सहा तरुणांचा मृत्यू, देहराडूनच्या महाविद्यालयात शिकत होते तरुण

**देहराडून :** मसुरी देहराडून महामार्गावर कार दरीत कोसळून भीषण अपघात झाला. या अपघातात सहा तरुणांचा मृत्यू झाला आहे. ही घटना मसुरी देहराडून महामार्गावरील चुनाखानजवळ घडली. या घटनेत देहराडूनच्या आयएमएस कॉलेजमध्ये शिकणाऱ्या चार तरुणांसह दोन तरुणांचा मृत्यू झाल्यानं हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. घटनास्थळी मसुरी पोलीस आणि अग्निशमन दलाच्या जवानांसह एसडीआरएफचं पथक दाखल झालं. बचाव पथकानं बचावकार्य केलं.

मसुरीला फिरायला गेले होते तरुण आणि तरुणी : देहराडून इथल्या आयएमएस महाविद्यालयातील चार तरुण आणि दोन तरुणी मसुरी इथं फिरायला गेले होते. यावेळी चुनाखानजवळ या तरुणांची कार अनियंत्रित झाली. कारवरील नियंत्रण सुटल्यानंतर ही कार खोल दरीत कोसळली. यावेळी कारमधील चार तरुणांचा जाग्यावरचं मृत्यू झाल्याची माहिती स्थानिकांनी दिली. घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. या घटनेची माहिती मसुरी पोलीस आणि अग्निशमन दलाच्या जवानांना देण्यात आली. त्यानंतर मसुरी पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली.

तरुणांचा घटनास्थळीच मृत्यू : मसुरी देहराडून महामार्गावर कार दरीत कोसळून झालेल्या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला. या अपघातात कार दरीत कोसळल्यानंतर त्यांना पोलीस आणि अग्निशमन दलाच्या जवानांसह एसआरडीएफच्या पथकानं बाहेर काढलं. यावेळी तरुणांचा घटनास्तळीचं मृत्यू झाल्याचं स्थानिकांनी सांगितलं. कारमधील दोन तरुणींना गंभीर जखमी अवस्थेत बाहेर काढण्यात आलं. त्यांना १०८ रुग्णावाहिकेतून देहराडून इथल्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र त्यांना वाचवण्यात डॉक्टरांना यश आलं नाही. तर चार तरुणांचे मृतदेह मसुरी उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. मसुरी पोलीस मृतांची ओळख पटवण्याचा प्रयत्न करत आहेत.

खोल दरी असल्यानं बचावकार्यात अडथळा : देहराडूनच्या आयएमएस महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गाडीला अपघात झाल्यानं परिसरात मोठी खळबळ उडालीय या तरुणांची कार खोल दरीत कोसळल्यानं अग्निशमन दल, पोलीस आणि एसआरडीएफच्या पथकाला मोठ्या अडथळ्यांचा सामना करावा लागला. त्यामुळेच बचावपथक खोल दरीत पोहोचण्याअगोदरच त्या चार तरुणांचा मृत्यू झाला होता. तर गंभीर जखमी असलेल्या तरुणींचाही रस्त्यातच मृत्यू झाला. या घटनेचा पुढील तपास मसुरी पोलीस करत आहे, अशी माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे.

## अमित शाह यांच्याविरोधात हैदराबादमध्ये गुन्हा दाखल



**हैदराबाद :** लोकसभा निवडणुकीच्या सात टप्प्यापैकी दोन टप्प्यातील मतदान पार पडले आहे. आता तिसऱ्या टप्प्यासाठी ७ मे रोजी मतदान पार पडणार आहे. त्यामुळे सध्या सर्वच ठिकाणी प्रचाराची धामधूम जोरात सुरू आहे. सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांकडून सभा, रॅली, मेळाव्यांचा धडाका सुरू आहे. अशातच मोठी बातमी समोर आली असून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर आचारसंहितेचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. हैदराबादमध्ये निवडणुकीच्या प्रचारादरम्यान गृहमंत्री अमित शाह यांनी आचारसंहितेचे उल्लंघन केल्याचा आरोप काँग्रेस पक्षाच्यावतीने करण्यात आला आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची १ मे रोजी हैदराबादमध्ये निवडणुकीच्या प्रचाराच्यानिमित्ताने रॅली आयोजित करण्यात आली होती. या रॅलीत अमित शाह यांच्यासह तेलंगणा भाजपाचे पदाधिकारीही सहभागी झाले होते. या रॅलीमधील काही फोटो समोर आले असून या फोटोमध्ये अमित शाह यांच्याबरोबर व्यासपीठावर काही लहान मुले असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. यासंदर्भात तेलंगणा काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. त्यानंतर आयोगाने याची दखल घेतली. यासंदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाइम्सने दिले आहे.

**काँग्रेसने तक्रारीत काय म्हटलं?**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर आचारसंहितेचे उल्लंघन केल्याचा आरोप करत तेलंगणा काँग्रेस पक्षाचे नेते निरंजन रेड्डी यांनी निवडणूक आयोगाकडे तक्रार केली. या तक्रारीत आरोप करण्यात आला आहे की, १ मे रोजी भाजपाची हैदराबादमध्ये रॅली पार पडली. या रॅलीमध्ये अमित शाह यांच्यासह आदी पदाधिकारी सहभागी झाले होते. यावेळी रॅलीदरम्यान अमित शाह यांच्याबरोबर काही लहान मुले व्यासपीठावर दिसून आली आहेत.

व्यासपीठावरील या लहान मुलांच्या हातात भाजपाचे चिन्ह कमळ असणारे एक फलक धरण्यात आले आहे. त्यामुळे हे आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन असून योग्य ती कारवाई करण्यात यावी, असे निरंजन रेड्डी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीत म्हटले आहे. निरंजन रेड्डी यांनी पुढे असेही म्हटले की, लोकसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर आयोगाने काही महत्वाच्या सूचनाही प्रसिद्ध केल्या होत्या. त्यामध्ये राजकीय पक्षांकडून निवडणुकीच्या प्रचारात किंवा सभा आणि निवडणकीच्या संबंधित मोहिमेमध्ये लहान मुलांचा वापर करण्यात येऊ नये, असे बजावले होते.

## राहुल गांधी अमेठी सोडून रायबरेलीच्या मैदानात

**राजदंड न्यूज नेटवर्क :** गुरुवारी रात्री उशिरापर्यंत असाच कयास बांधला जात होता की राहुल गांधी अमेठी मतदारसंघातून निवडणूक लढवतील आणि रायबरेली मतदारसंघातून कोणाला उभं करावं याबद्दल काँग्रेसमध्ये गोंधळाचं वातावरण आहे. मात्र गुरुवारी रात्री उशिरा झालेल्या बैठकीत जे झालं त्याचा अंदाज कोणालाही नव्हता.

मागील १५ दिवसांपासून राहुल गांधी आणि अमेठी मतदारसंघाविषयी जोरदार चर्चा सुरू होती. या चर्चेला पूर्णविराम देत राहुल गांधी यांनी रायबरेली लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. तर अमेठी मतदारसंघातून काँग्रेसचे विश्वासू किशोरी लाल शर्मा यांना तिकिट देण्यात आलं आहे.

राहुल गांधी रायबरेली मतदारसंघातून निवडणूक लढवणार असल्याचं जाहिर झाल्यानंतर काँग्रेस नेत्यांबरोबरच रायबरेलीतील सर्वसामान्य जनतेमध्येदेखील मोठा उत्साह पाहायला मिळाला. मात्र भाजपाच्या कार्यकर्त्यांचं म्हणणं आहे की रायबरेलीची जनता राहुल गांधी यांना निवडून देणार नाही.

**काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साह**

राहुल गांधी रायबरेली मतदारसंघातून निवडणूक लढवणार असल्याचं स्पष्ट झाल्यानंतर काँग्रेस नेत्यांमध्ये आनंदाचं वातावरण दिसतं आहे.

उत्तर प्रदेश काँग्रेस समितीचे सदस्य असलेले राहुल बाजपेयी म्हणाले, राहुल गांधी तरुण आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बोलत आहेत आणि देशातील भ्रष्टाचारी सरकारविरुद्ध लढत आहेत. ते रायबरेलीतून निवडणूक लढवत आहेत हे आमचं सौभाग्य आहे.

गमतीचा भाग म्हणजे काँग्रेसचे विश्वासू आणि सोनिया गांधी यांचे प्रतिनिधी किशोरी लाल शर्मा यांनी एक मेला रायबरेली आणि अमेठीमध्ये पक्षाच्या कार्यकर्त्यांची आणि नेत्यांची बैठक घेतली होती. त्या बैठकीत देखील रायबरेली आणि अमेठीतून काँग्रेसच्या तिकिटावर नेमकं कोण उभं राहणार हे किशोरी लाल सांगू शकले नव्हते.

मात्र सकाळी जेव्हा राहुल गांधी रायबरेलीतून निवडणूक लढवणार असल्याची बातमी आली तेव्हा पाहता सोनिया गांधी, प्रियंका गांधी आणि काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांच्यासोबत राहुल गांधी आपला उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी पोचले होते.

राहुल गांधी रायबरेलीतून निवडणूक लढवणार असल्याचं जाहीर होताच समाजवादी पार्टीच्या कार्यकर्त्यांची देखील गर्दी दिसून आली. राहुल गांधी रायबरेलीतून उभे राहणार असल्याकडे कार्यकर्ते वेगळ्या दृष्टीने पाहत आहेत. त्यांना वाटतं आहे की ते इंडिया आघाडीकडून पंतप्रधानपदाच्या उमेदवाराला रायबरेलीतून निवडून देणार आहेत.

काँग्रेसचे कार्यकर्ते असलेले मोहम्मद अक्रम म्हणाले की गांधी परिवार या मतदारसंघातून नेहमीच जिंकत आला आहे. यावेळेस राहुल गांधी पहिल्यांदा या मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. ते इंडिया आघाडीचा चेहरा आहेत. इथून ते किमान सहा लाख मतांनी जिंकतील. रायबरेली मतदारसंघ गांधी कुटुंबाचा पारंपारिक मतदारसंघ समजला जातो. मात्र काहीवेळा अशीही वेळ आली आहे की ज्यावेळेस गांधी कुटुंबाने आपल्या जवळच्या व्यक्तीला इथून निवडणुकीच्या मैदानात उभं केलं आहे. सोनिया गांधींच्या आधी राजीव गांधींचे मित्र असलेले कॅप्टन सतीश शर्मा यांनी इथून निवडणूक लढवली होती. मात्र २००४ पासून सोनिया गांधीच रायबरेलीच्या खासदार म्हणून निवडून गेल्या आहेत.

## मी कधीही डोपिंग टेस्टसाठी नकार दिला नव्हता': बजरंग पुनिया



**राजदंड न्यूज नेटवर्क :** मी कधीही नाडाच्या अधिकाऱ्यांना डोपिंग टेस्टसाठी नमुना देण्यासाठी कधीही नकार दिला नाही, असं कुस्तीपटू बजरंग पुनियाने म्हटलं आहे.

बजरंग पुनियाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर लिहिलं आहे की, माझ्यासंबंधी डोपिंग टेस्ट बद्दल जी बातमी येत आहे, त्याविषयी मला स्पष्टीकरण द्यायचं आहे. मी कधीही नाडाच्या अधिकाऱ्यांना सँपल द्यायला नकार दिला नाही.

बजरंग पुनियाने एक जुना व्हीडिओ शेअर करत म्हटल की, मी त्यांना विनंती केली की पहिल्यांदा माझं सँपल घेण्यासाठी ते जे एक्सपायरी किट घेऊन आले होते त्यावर उत्तर द्यावं. त्यावर त्यांनी कोणती कारवाई केली, काय पावलं उचलली हे सांगावं.

आधी या गोष्टीचं उत्तर द्यावं आणि मग माझी डोपिंग टेस्ट घ्यावी. माझी वकील विदुष सिंघानिया त्यांच्या पत्राला योग्यवेळी उत्तर देतील.

बजरंग पुनियाने नाडाच्या अधिकाऱ्यांना सँपल द्यायल नकार दिला, म्हणून त्याला निलंबित करण्यात आलं, अशा आशयाचे वृत्त माध्यमांमधून प्रसिद्ध झाली आहेत.

या वृत्तांमध्ये बजरंग पुनियाला निलंबनाच्या कारवाईला उत्तर देण्यासाठी ७ मे पर्यंतचा वेळ देण्यात आला आहे.

बजरंग पुनियाने २०२० च्या टोकियो ऑलिंपिकमध्ये कांस्य पदक जिंकलं होतं.

भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष बृजभूषण शरण सिंह यांच्याविरोधाती महिला कुस्तीपटूंच्या आंदोलनात बजरंग पुनियाही सहभागी झाला होता.